१०२ शतकोत्तर वाटचाल
R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवा काळ
• मुंबई, रविवार ९ फेब्रुवारी, २०२५ • वर्ष-१०२, अंक-३३५, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL
• Issue - 335, Vol.- 102 Marathi - Daily - Mumbai, 9 February, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

आतील पानांत...
- आपचा दारुण पराभव ! प्रमुख नेते पराजित अरविंद केजरीवालना पराभवाचा धक्का
- जरांगेंचे शनिवारपासून पुन्हा बेमुदत उपोषण
- साईबाबा हिंदूच! धर्मगुरु कालीचरण यांचा दावा



# छोट्या जाहिराती

**संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत. पगार 17000/- कांदिवली पश्चिम : **9769723512** {NC244315}

मुंबई, दिल्ली - घरकाम, जेवण बनविण्यासाठी, मुलांना सांभाळणे, पेशंट केअरसाठी मुली/महिला पाहिजेत. राहणे- खाणे फ्री, चांगला पगार.**9819339480** (एजेंट सहभागी होऊ शकतात) {NC244164}

पेस्टकंट्रोल कामासाठी अनुभवी/बिनअनुभवी मुले (टेक्निशियन) पाहिजे. वरळी - **9892821963 / 9323092948** {NC244456}

**KHFM Hospitality & Facility Management Services Ltd., Marol Naka, Andheri 3 बागकाम पर्यवेक्षक (गार्डनिंग सुपरवायझर) पाहिजे. संपर्क - 022 69774300, 8655663020** {NC244455}

पवई- हिरानंदानी साईटसाठी भारी संख्येत सिक्युरीटीगार्ड पाहिजेत. पगार - 15000/- आणि 4 सुट्टी. संपर्क : **9223290004 / 9223290001/ 9372264341 / 9594933933.** {NC244453}

डिलिव्हरी बॉयज पाहिजेत. पगार + प्रवास खर्च कुर्ला पश्चिम. संपर्क - **9326832523** {NC244450}

त्वरित भरती सेक्युरिटी गार्ड कळवासाठी, ड्युटी 8 तास, पगार 9000/-,संपर्क - **9004883251** {NC244447}

निवृत्त / VRS / बँकर्स / सुशिक्षित लोकांसाठी SSC पास अतिशय चांगले उत्पन्न. **8169881070** (NC244387)

घरकामासाठी 24 तास बाई पाहिजे. मोबाईल - **9137419748** {NC244461}

8/10/24 तास बेबीकेअरसाठी अनुभवी शिक्षित बाई मुली पाहिजेत. **9892281907, 8779487284** {NC244465}

विरार स्टेशनजवळ (इमीटेशन ज्वेलरीचे काम) स्टोन लावण्यासाठी मुली/महिला पाहिजेत. (दिवसाचे 300/- -320/-) **9819892369 / 9820072369** {NC244478}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. पगार 22500 विक्रोळी, ठाणे, दादर, कुर्ला, **8928312713** {NC244488}

सोसायटीत हाऊसकिपिंगसाठी तरुण अनुभवी मुलगा पाहिजेत. चिंचपोकळी पगार 12000/- **9699927271** {NC244502}

## पाहिजेत

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशिअन पाहिजेत. चांगला पगार. इतर सुविधा. **9820683431 / 25325762** {NC244484}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता Office Assistance cum Telecaller पाहिजेत. संपर्क : **9820989331 / 9820683431** {NC244481}

मालाड मालवणीत म्हातारी बाईला बघून घरकाम करु शकेल तशी बाई पाहिजे. 4 तास 15000/- 10 तास 24000/- (24 तास 28000/-) **9004682509** {NC244485}

आश्रममध्ये कामासाठी आयाबाई आणि जेवणासाठी बाई हवी (24 तास) ठिकाण डोंबिवली **8379998437** {NC244444}

सिक्युरिटी/रिसेप्सनिस्ट हाऊसकिपिंग कामासाठी मुली/महिला पाहिजेत. संपर्क - १०३, निर्मलाधाम, प्रभातनगर, गावदेवी मैदान, ठाणे स्टेशन (वेस्ट) - **7304179292** {NC244486}

बँक व्हेरिफिकेशन एजन्सीला फिल्ड कामासाठी मुले पाहिजेत. ठाणे, मुंबई, नवीमुंबईसाठी. पगार फुलटाईम 10,000-12,000 प्रिसाईस सर्विसेस. **9769108450 / 8369564939** {NC244499}

मल्टिनॅशनल हाउसकीपिंग कंपनीमध्ये जेंट्स / लेडीज जेनिटर्स, सुपरवायझर, पॅन्ट्री स्ट्रीवर्ड, ऑफिस बॉय अर्जंट पाहिजेत. वयोमर्यादा 18 ते 35, पगार महाराष्ट्र शासनद्वारे मान्यता असलेला. सोबत भरपगारी रजा, बोनस आणि ESIC. कागदपत्रासह भेटा - मे. मास्टर पॉलिशर्स प्रा. लिमिटेड, S-02 सुचिता सोसायटी, कालीना चर्चरोड, सांताक्रुज पूर्व, मुंबई 400029. नारायण धुरी - **9819795525** {NC244500}

पाहिजेत वायरमन, इलेक्ट्रिशियन, ग्रेविटी डाई कास्टिंग - डाई मेकर, हेल्पर, HMP इंडस्ट्री, बी-24, बोनान्झा इंडस्ट्रीयल, कांदिवली ईस्ट - **9819076600 / 9820028284** {NC244501}

रेस्टॉरंट स्टाफची तातडीने गरज आहे... 1. मराठी वेटर 2-3, 2. स्नॅक्स आणि मिठाईसाठी आचारी 2-3, 3. किचन हेल्पर 2-3, 4. पाणी फडक्यावर 2-3, संपर्क: पणशीकर अँड कंपनी दादर (पश्चिम) मुंबई-**8928885635** {NC244512}

## पाहिजेत

हाऊसकिपिंग सुपरवायजर (महिलांना प्राधान्य), वॉर्ड बॉय आणि मावशी त्वरित पाहिजेत. डोंबिवलीतील मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी **9324493909 / 7700982001** {NC244503}

विलेपार्ले येथे नामांकित शाळा-कॉलेजसाठी प्यून (शिपाई) (महिला-पुरुष) पाहीजेत. PF आणि ESIC चा लाभ मिळेल. (चर्चगेट ते बोरीवली मधील लोकांना पहिले प्राधान्य). मो. **8850492045, 9820426010** {NC244504}

## Situation Vacant

Required urgent operators for Pest Control in Ghatkopar **9322269485** {NC244505}

## व्यवसाय विषयक

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अ‍ॅग्रीमेंट - **9028160157** {NC244491}

फक्त 600/- investment + product घेऊन दररोज 1000-2000/- इन्कम कमवा. **8767437988** {NC244511}

## जागा विषयक

शिवडी, वडाळा, सायन, चेंबूर, माहिम, परेल, लालबाग, रुम, फ्लॅट, दुकाने खरेदी/विक्री/भाड्याने **9222172964** {NC244508}

## महिलांसाठी

घरूनं Queen ब्रँड सॅनिटरी पॅड व्यवसाय करून महिना १०००/- ते २५०००/- कमवा - **8169579108** (NC244397)

## वर पाहिजे

गरीब घरची मुलगी 27, 12वी, दवाखान्यात रिसेप्शनिस्ट 12000/- मुलीला वडील नाहीत. जातीची अट नाही. कष्टाळू मुलगा हवा. त्वरीत विवाह **8956644802** {NC244490}

## फिल्म विषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरियल, अल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यतेअनुसार मौका (ऑडिशन / ट्रेनिंग) : **9987024100, 8369152017** {NC244506}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# एक देश, एक वेळ का गरजेची?

**एक देश, एक निवडणूक, एक देश एक रेशन कार्ड, एक देश एक कर यानंतर आता 'एक देश, एक वेळ' या संकल्पनेची चर्चा जोरदार सुरू आहे. देशात सगळीकडे एकच वेळ असावी यासाठी भारतीय प्रमाणवेळेचा वापर करणे आता बंधनकारक करण्यात येणार आहे. बॅंकिंग, टेलिकम्युनिकेशन, ५जी, संरक्षण, एआय आदी नव्या टेक्नॉलॉजीसह महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये वेळेचे पालन निश्चित करण्याचा एक प्रयत्न म्हणून ग्राहक मंत्रालयाने हा प्रस्ताव मांडला आहे.**




■ **शहाजी शिंदे**
लेखक सॉफ्टवेअर तज्ज्ञ असून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील घडामोडींचे विश्लेषक आहेत.


**रविवार विशेष**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे अनेक भाषा, संस्कृती आणि परंपरा आहेत. या भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेमुळे वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेळेचा वेगवेगळा प्रमाणमान वापरण्यात येतो. सध्या भारतात अधिकृत वेळ 'भारतीय प्रमाण वेळ' (आयएसटी) म्हणून वापरली जाते, जी ग्रीनविचच्या प्रमाणवेळेपेक्षा (जीमएटी) +५:३० तास पुढे आहे. मात्र, भारतात वेगवेगळ्या राज्यांतील दिवसातील सूर्योदय आणि वेळेचा प्रभाव वेगवेगळा असतो. त्यामुळे 'एक राष्ट्र, एक वेळ' ही संकल्पना चर्चेत आली आहे.



### भारतीय प्रमाणवेळेचा इतिहास

ब्रिटिश राजवटीदरम्यान भारतात दोन वेगवेगळ्या वेळा प्रचलित होत्या. मुंबई, कोलकाता आणि मद्रास यांसाठी वेगवेगळे वेळापत्रक होते. १९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतर, १९४८ मध्ये वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेने 'भारतीय प्रमाण वेळ' निश्चित केली, जी अलाहाबादजवळील नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीमध्ये नियंत्रित केली जाते.

### 'एक राष्ट्र, एक वेळ' म्हणजे काय?

- 'एक राष्ट्र, एक वेळ' म्हणजे संपूर्ण भारतात एकच प्रमाणवेळ लागू करणे. सध्या ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये सूर्य उगवण्याची आणि मावळण्याची वेळ इतर भागांपेक्षा लवकर असते. त्यामुळे तिथे लोक वेगळ्या वेळेचे पालन करण्याचा आग्रह धरतात. हे लक्षात घेता आता भारतात सबंध देशात एकच आणि अचूक वेळ लागू करण्यासाठी जीपीएसऐवजी स्वत:चे 'नाविक'यंत्रणेचा वापर करण्याची तयारी सध्या प्रगतीपथावर आहे.
- या माध्यमातून प्रादेशिक केंद्रात बसविलेल्या अणु घड्याळांमध्ये एक देश एक वेळ निश्चित करणे, परकी प्रणालीवरचे अवलंबित्व कमी करणे आणि राष्ट्रीय सुरक्षेला चालना देणे हे उद्दिष्ट आहे.
- अणु घड्याळ मायक्रो सेकदांपर्यंत वेळ मोजण्यात सक्षम आहेत. ही घड्याळे अणुच्या कंपनाचा वापर करतात. देशात अहमदाबाद आणि फरिदाबाद येथे अणु घड्याळे बसविण्यात आली असून ती अचूक वेळ सांगण्याचे काम करतात.

### 'आयएसटी'मधील उणिवा

देशातील कामकाज हे भारतीय प्रमाणवेळेनुसार (आयएसटी) चालत असले तरी सध्या देशातील अचूक वेळ ही जीपीएस उपग्रहाच्या मदतीने निश्चित करण्यात येते. यात मिलिसेकंदांचा फरक असतो. ही वेळ को-ऑर्डिनेटेड युनिव्हर्सल टाइमला (यूटीसी) जोडलेली आहे, आयएसटी ५.३० तास ऑफसेटसह यूटीसीवर आधारित आहे. पण पुढील काही महिन्यांत यात बदल होऊन एनपीएल लवकरच संदर्भ वेळ प्रदान करण्यासाठी नेव्हिगेशन विथ इंडियन कॉन्स्टिलेशन (नाविक) प्रणालीला जोडण्यात येणार आहे.

### कशी असेल कार्यपद्धती?

फरिदाबाद येथील 'एनपीएल'ला म्हणजेच राष्ट्रीय भौतिक शाळेला 'नाविक' म्हणजेच नेव्हिगेशन विद इंडियन कंसटलेशनकडून डेटा मिळेल आणि तो ऑप्टिक फायबर लिंकद्वारे अन्य चार केंद्रासह सामायिक केला जाईल.

- अहमदाबाद, बंगळुरु, भुवनेश्वर आणि गुवाहाटी सारख्या इतर चार केंद्रांना पाठवला जाईल. या ठिकाणी अणु घड्याळे बसवली जातील. अणु घड्याळांचा वापर केल्याने डिजिटल घड्याळे, स्मार्टफोन आणि लॅपटॉपवर दाखवला जाणारा टाइम सर्व्हिस प्रोवाइडर्सच्या जीपीएस-आधारित डेटावरुन नव्हे तर अणु घड्याळांमधून मिळवला जाईल याची खात्री होईल. लवकरच ही प्रादेशिक केंद्रे सर्व वापरकर्त्यांना वेळ उपलब्ध करुन देतील, ज्यामुळे 'एक देश, एक वेळ' प्रणाली लागू होईल.

**अणु घड्याळाची अचूकता पहावयाची असल्यास ती प्रत्येक १०० दशलक्ष वर्षामध्ये वेळ सांगण्यात फक्त एक सेकंदाचा फरक करतात. त्याचवेळी ऑप्टिकल अ‍ॅटोमिक घड्याळ ३०० अब्ज वर्षांपर्यंत वेळेत अचूकता राखण्याचे काम करेल.**

काही महिन्यापूर्वी एनपीएल फरिदाबादसह 'नाविक' लिंकची चाचणी करण्यात आली. 'एनपीएल' इस्त्रोच्या मदतीने मायक्रो सेकंदापर्यंतची अचूकता मिळवत 'आयएसटी' उपलब्ध करून देण्यावर काम करत आहे. त्याला ऑप्टिक फायबर केबलच्या माध्यमातून डेटा आदानप्रदान करण्यात लागणारा वेळ हाताळत करण्यासाठी फरिदाबादसह चार केंद्रातील घड्याळांना जोडावे लागणार आहे. 'नाविक' हे पूर्वी भारतीय प्रादेशिक उपग्रह प्रणालीच्या नावाने ओळखले जात होते. ही एक स्वदेशी उपग्रह नेव्हिगेशन सिस्टिम असून प्रारंभीच्या काळात सामरिकदृष्ट्या वापरण्यापुरतीच तिचा वापर व्हायचा. त्याची निर्मिती इस्त्रोने केली आहे.

### काय साधणार?

वेळेच्या अचूकतेमुळे आर्थिक व्यवहार सुलभ होतील, आपत्कालिन प्रतिसादात तत्परता येईल अणि सार्वजनिक वाहतुकीचे वेळापत्रकात अचूकता येईल. नेव्हिगेशन, दूरसंचार, फाईव्ह जी तंत्रज्ञान, एआय, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि पॉवर ग्रीड सिंक्रोनायजेशनमध्ये याचा चांगला फायदा मिळणार आहे.

- सध्या दूरसंचार सेवा देणारे आणि इंटरनेट सेवा देणाऱ्या कंपन्या आयएसटीऐवजी जीपीएसचा वापर करतात. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि गंभीर पायाभूत सुविधांच्या विश्वासार्हतेला धोका निर्माण होऊ शकतो. या गोष्टी एक देश, एक वेळ माध्यमातून टाळल्या जातील.
- ग्राहक व्यवहार विभागाचे माजी सचिव रोहित कुमार सिंह यांच्या मते, भारताने स्वत:चे अचूक आणि विश्वसनीय नेटवर्क स्थापन केल्याने परकी प्रणालीवरचे अवलंबित्व कमी होईल. तसेच राष्ट्रीय सुरक्षाही वाढ होईल. यामुळे संरक्षण, वीज, दूरसंचार, बॅंकिंग आणि परिवहन यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना लाभ मिळेल. कारण ही यंत्रणा पुरेशी दक्षता बाळगत आणि समन्वय साधत सायबर धोके रोखण्याचे काम करेल. या आघाडीवर तांत्रिक पातळीवर काम सुरू आहे. यासंदर्भात ग्राहक व्यवहार विभागाने नियमांचा मसुदा जारी केला आहे. यानुसार कायदे, प्रशासकीय, वाणिज्यिक आणि अधिकृत दस्तावेजासाठी एकमेव प्रमाण वेळच्या रुपातून आयएसटीचा वापर करणे बंधनकारक करण्यात येईल. खगोल विज्ञान, नेविगेशन अणि विज्ञान संशोधनसारख्या विशेष क्षेत्रासाठी अपवादात्मक परवानगी दिली जाईल.

ग्राहक मंत्रालयाचा हा मसुदा सार्वजनिक सल्लामसलत विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या मसुद्यावर १४ फेब्रुवारी पर्यंत सूचना आणि शिफारशी मागवल्या आहेत.

**कारगिल युद्धाचा संबंध**

- **कारगिल युद्धाने स्वदेशी वेळ प्रणालीची तातडीची गरज अधोरेखित केली आहे. शत्रूच्या स्थानांना अचूकपणे लक्ष्य करण्याच्या भारताच्या क्षमतेला परदेशी उपग्रहांकडून मिळालेल्या वेळेच्या डेटावर अवलंबून राहिल्यामुळे अडथळा निर्माण झाला होता.**
- **मोदी सरकारने त्याचे सामरिक महत्त्व ओळखून सात वर्षांपूवी या योजनेवर काम सुरू केले. फरिदाबाद, अमहदाबाद, बंगळूर अणि भुवेश्वर येथे अटोमिक घड्याळ बसविण्यात आले आहे.**

## महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 06 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 08/02/2025

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 7909 | 4467 (पवार लॉटरी - ठाणे) | 2737 | 9773 | 5859 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 6006 | 8029 | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 5846 | 6403 | 7636 | 8542 | 9972 | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0163 | 3039 | 4046 | 4352 | 6205 | 6988 | 8388 | 8493 | 9568 | 9613 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2948 | 2962 | 3014 | 3331 | 5612 | 5694 | 7741 | 8116 | 9041 | 9170 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0853 | 1454 | 2322 | 3103 | 3961 | 4862 | 5981 | 6856 | 7761 | 9259 |
| | 0865 | 1581 | 2347 | 3273 | 4114 | 5193 | 5996 | 6883 | 7814 | 9309 |
| 0000 | 0892 | 1613 | 2366 | 3276 | 4144 | 5249 | 6245 | 6908 | 7852 | 9319 |
| 0020 | 0939 | 1617 | 2390 | 3316 | 4330 | 5253 | 6336 | 6917 | 7897 | 9328 |
| 0068 | 1042 | 1647 | 2423 | 3385 | 4341 | 5306 | 6347 | 6940 | 8085 | 9339 |
| 0089 | 1134 | 1676 | 2444 | 3443 | 4346 | 5402 | 6465 | 6999 | 8122 | 9429 |
| 0208 | 1141 | 1699 | 2462 | 3473 | 4402 | 5435 | 6497 | 7017 | 8230 | 9497 |
| 0260 | 1145 | 1716 | 2492 | 3477 | 4455 | 5458 | 6509 | 7180 | 8289 | 9656 |
| 0300 | 1151 | 1792 | 2548 | 3478 | 4467 | 5505 | 6615 | 7349 | 8328 | 9659 |
| 0332 | 1153 | 1872 | 2586 | 3520 | 4472 | 5522 | 6632 | 7374 | 8409 | 9695 |
| 0336 | 1214 | 1915 | 2628 | 3562 | 4488 | 5523 | 6652 | 7417 | 8418 | 9709 |
| 0420 | 1251 | 1964 | 2659 | 3682 | 4594 | 5552 | 6656 | 7419 | 8558 | 9760 |
| 0454 | 1268 | 2041 | 2682 | 3708 | 4648 | 5570 | 6683 | 7571 | 8652 | 9778 |
| 0472 | 1321 | 2124 | 2764 | 3733 | 4659 | 5594 | 6691 | 7574 | 8823 | 9894 |
| 0501 | 1341 | 2157 | 2777 | 3750 | 4690 | 5625 | 6693 | 7587 | 8860 | 9902 |
| 0599 | 1357 | 2202 | 2818 | 3798 | 4717 | 5687 | 6818 | 7602 | 8887 | 9943 |
| 0602 | 1405 | 2229 | 2991 | 3843 | 4752 | 5850 | 6825 | 7605 | 8899 | 9951 |
| 0620 | 1444 | 2256 | 3046 | 3851 | 4774 | 5935 | 6826 | 7657 | 8978 | 9974 |
| 0720 | 1446 | 2258 | 3088 | 3911 | 4817 | 5936 | 6827 | 7662 | 8985 | 9986 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शनिवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 06 | सोडत दिनांक 08/02/2025

| | |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | ML-09 : 2768 |
| उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 2768 — किशोर लॉटरी सेंटर, सांगली; न्यु महाराजा एन्टरप्रायझेस - इचलकरंजी; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1705 | 3866 | 4853 | 5611 | 5865 | 6137 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1772 | 3148 | 3833 | 5954 | 6417 | 6722 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1816 | 2113 | 3045 | 5453 | 6121 | 6375 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1215 | 1943 | 2092 | 2229 | 3104 | 3406 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1826 | 2222 | 2721 | 3296 | 3630 | 4205 | 4491 | 4999 | 5507 | 5758 | 6126 | 6637 |
| | | 1828 | 2224 | 2724 | 3313 | 3633 | 4224 | 4494 | 5004 | 5510 | 5759 | 6131 | 6639 |
| 1001 | 1352 | 1836 | 2240 | 2744 | 3314 | 3638 | 4240 | 4499 | 5019 | 5522 | 5764 | 6132 | 6641 |
| 1008 | 1373 | 1852 | 2247 | 2745 | 3316 | 3643 | 4249 | 4517 | 5051 | 5526 | 5765 | 6178 | 6646 |
| 1018 | 1380 | 1869 | 2248 | 2807 | 3323 | 3649 | 4250 | 4570 | 5056 | 5535 | 5784 | 6190 | 6655 |
| 1060 | 1394 | 1880 | 2258 | 2808 | 3324 | 3703 | 4257 | 4584 | 5079 | 5538 | 5790 | 6195 | 6657 |
| 1079 | 1401 | 1894 | 2260 | 2821 | 3331 | 3732 | 4262 | 4589 | 5089 | 5543 | 5795 | 6196 | 6658 |
| 1082 | 1409 | 1910 | 2264 | 2822 | 3340 | 3743 | 4309 | 4597 | 5099 | 5545 | 5802 | 6198 | 6662 |
| 1101 | 1411 | 1911 | 2274 | 2832 | 3351 | 3753 | 4317 | 4612 | 5125 | 5547 | 5835 | 6206 | 6666 |
| 1106 | 1415 | 1913 | 2282 | 2842 | 3356 | 3763 | 4330 | 4614 | 5136 | 5549 | 5855 | 6211 | 6670 |
| 1111 | 1430 | 1935 | 2340 | 2845 | 3357 | 3787 | 4343 | 4619 | 5150 | 5555 | 5865 | 6216 | 6673 |
| 1112 | 1449 | 1973 | 2352 | 2880 | 3373 | 3879 | 4355 | 4640 | 5178 | 5556 | 5876 | 6250 | 6687 |
| 1113 | 1458 | 1988 | 2354 | 2899 | 3377 | 3893 | 4363 | 4648 | 5204 | 5559 | 5895 | 6256 | 6691 |
| 1120 | 1471 | 1997 | 2383 | 2900 | 3382 | 3912 | 4369 | 4659 | 5207 | 5562 | 5898 | 6267 | 6698 |
| 1121 | 1477 | 2010 | 2397 | 2925 | 3391 | 3921 | 4400 | 4736 | 5211 | 5564 | 5915 | 6273 | 6716 |
| 1135 | 1484 | 2012 | 2402 | 2934 | 3396 | 3928 | 4401 | 4745 | 5213 | 5567 | 5928 | 6274 | 6722 |
| 1146 | 1551 | 2029 | 2410 | 2952 | 3418 | 3936 | 4404 | 4747 | 5242 | 5570 | 5950 | 6276 | 6753 |
| 1148 | 1553 | 2065 | 2421 | 2969 | 3420 | 3951 | 4407 | 4774 | 5256 | 5577 | 5951 | 6300 | 6755 |
| 1149 | 1581 | 2091 | 2503 | 2998 | 3422 | 3953 | 4418 | 4796 | 5258 | 5578 | 5956 | 6306 | 6760 |
| 1154 | 1608 | 2092 | 2517 | 3010 | 3424 | 3957 | 4421 | 4797 | 5259 | 5579 | 5965 | 6360 | 6767 |
| 1156 | 1612 | 2101 | 2526 | 3027 | 3446 | 3962 | 4423 | 4825 | 5267 | 5585 | 5966 | 6367 | 6786 |
| 1158 | 1619 | 2102 | 2527 | 3033 | 3447 | 3985 | 4426 | 4842 | 5270 | 5591 | 5969 | 6368 | 6795 |
| 1168 | 1624 | 2117 | 2532 | 3046 | 3465 | 4043 | 4433 | 4843 | 5278 | 5595 | 5988 | 6386 | 6827 |
| 1173 | 1626 | 2120 | 2542 | 3119 | 3472 | 4047 | 4443 | 4844 | 5329 | 5615 | 5990 | 6396 | 6837 |
| 1191 | 1691 | 2122 | 2563 | 3120 | 3498 | 4048 | 4449 | 4846 | 5335 | 5616 | 5999 | 6437 | 6867 |
| 1192 | 1698 | 2124 | 2582 | 3133 | 3503 | 4060 | 4458 | 4862 | 5342 | 5618 | 6014 | 6450 | 6870 |
| 1193 | 1749 | 2129 | 2617 | 3135 | 3513 | 4074 | 4461 | 4879 | 5354 | 5635 | 6048 | 6464 | 6880 |
| 1198 | 1779 | 2138 | 2619 | 3147 | 3529 | 4088 | 4462 | 4925 | 5358 | 5655 | 6052 | 6472 | 6886 |
| 1212 | 1784 | 2161 | 2626 | 3156 | 3551 | 4094 | 4470 | 4926 | 5359 | 5670 | 6056 | 6477 | 6895 |
| 1217 | 1787 | 2168 | 2627 | 3166 | 3560 | 4114 | 4471 | 4936 | 5365 | 5685 | 6060 | 6498 | 6903 |
| 1232 | 1797 | 2178 | 2628 | 3174 | 3581 | 4126 | 4472 | 4941 | 5412 | 5702 | 6071 | 6532 | 6907 |
| 1254 | 1801 | 2200 | 2632 | 3177 | 3593 | 4144 | 4478 | 4947 | 5414 | 5721 | 6072 | 6565 | 6916 |
| 1261 | 1808 | 2203 | 2658 | 3206 | 3596 | 4161 | 4479 | 4949 | 5419 | 5729 | 6075 | 6609 | 6922 |
| 1270 | 1809 | 2205 | 2664 | 3236 | 3603 | 4164 | 4484 | 4957 | 5468 | 5740 | 6097 | 6612 | 6940 |
| 1326 | 1818 | 2208 | 2682 | 3251 | 3621 | 4193 | 4486 | 4964 | 5501 | 5750 | 6116 | 6619 | 6949 |
| 1339 | 1819 | 2212 | 2697 | 3271 | 3628 | 4199 | 4489 | 4987 | 5505 | 5753 | 6117 | 6623 | 6979 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# लाडक्या बहिणींची फसवणूक नाना पटोलेंचा पुन्हा आरोप

■ मुंबई

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून सत्तेत आलेल्या भारतीय जनता पक्ष महायुतीने राज्यातील लाखो माता भगिनींची घोर फसवणूक केली आहे. मतांसाठी सरसकट सर्व बहिणींना १५०० रुपये देऊन त्यांची मते घेतली व सत्तेवर आल्यानंतर मात्र या बहिणींना दिलेल्या मदतीला कात्री लावण्याचे पाप केले जात आहे. सरकारने ५ लाख बहिणींना अपात्र केले असून आणखी काही लाख बहिणींना असेच अपात्र केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने लाभार्थी बहिणींना अपात्र ठरवण्याची कृती म्हणजे लाडक्या बहिणींशी केलेली गद्दारी आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

# मराठवाड्यातील ५ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

■ छत्रपती संभाजीनगर

मराठवाड्यातील घरगुती, व्यापारी, उद्योग, शेती पाणीपुरवठा अशा ५०६५ वीजधारकांकडे १७ कोटी ८० लाख रुपयांची थकबाकी असल्याने या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला असल्याची माहिती महावितरण प्रादेशिक कार्यालयाचे सह व्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांनी दिली. राहुल गुप्ता यांनी महावितरण प्रादेशिक कार्यालयांच्या छत्रपती संभाजीनगर, लातूर व नांदेड परिमंडलातील मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा बैठक घेतली. या बैठकीत घरगुती, व्यापारी व उद्योग क्षेत्रातील ग्राहकांकडील थकबाकी, एप्रिल २०२४ पासून बिले न भरणाऱ्या ग्राहकांकडील थकबाकी, वीज जोडणी घेतल्यापासून बिले न भरणारे ग्राहकांकडे असलेली थकबाकी, कायमस्वरूपी खंडित ग्राहकांकडे असलेली थकबाकी, उच्चदाब वीज ग्राहकांकडे असलेली थकबाकी आदी विषयांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी राहुल गुप्ता यांनी सांगितले की, मराठवाड्यात वीज जोडणी केल्यापासून ५३,७७४ वीज ग्राहकांनी एकदाही वीजबिल भरलेले नाही. त्यांच्याकडे ७० हजार लाख २८ हजार रुपये थकबाकी आहे. त्यामुळे या थकबाकीदारांविरोधात धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे. वीजपुरवठा खंडित केल्यानंतरही थकबाकी न भरता परस्पर वीजपुरवठा जोडणाऱ्या ग्राहकांवर थेट पोलिसांत गुन्हे दाखल केले जात आहेत. वीजपुरवठा खंडित केला तरी वीजबिल भरून ते पूर्ववत करून घेण्याचे आवाहन राहुल गुप्ता यांनी केले.


**निविदा सूचना**

बारेट्टो हायस्कूलच्या वतीने किरकोळ नागरी दुरुस्ती / संरचनात्मक कामे, आंतर आणि बाह्य रंगकाम, शौचालय दुरुस्ती इत्यादी कामांसाठी निविदा आमंत्रित केल्या जात आहेत. निविदेच्या प्रती बारेट्टो हायस्कूल बिल्डिंग, कॅव्हल रोड, डॉ. विगास स्ट्रीट, कालबादेवी, मुंबई – ४०० ००२ येथील शाळेच्या कार्यालयात ०९ फेब्रुवारी २०२५ ते १२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत रु. ५००/– (अक्षरी पाचशे रुपये फक्त) रोख रकमेद्वारे मिळतील. सदर रक्कम नॉन–रिफंडेबल असून, मालक / विश्वस्त / पीएमसी यांनी निविदा रद्द केल्यास परत केली जाणार नाही.

निविदा अर्ज मिळण्याची शेवटची तारीख: १२ फेब्रुवारी २०२५, सायं. ४.०० वाजेपर्यंत

भरलेले निविदा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख: १४ फेब्रुवारी २०२५, सायं. ४.०० वाजेपर्यंत

ही निविदा सूचना व प्रक्रिया ही फक्त "ऑफर मागविण्याचे आमंत्रण" आहे, प्रत्यक्षात कोणतीही ऑफर नाही. मालक / विश्वस्त / पीएमसी यांना कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया रद्द / रद्दबातल / बदल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तसेच, याबाबत कोणतेही कारण सांगण्याची गरज नाही. निविदेचे नियम आणि अटी सर्व इच्छुक निविदाकारांसाठी लागू राहतील.

मेसर्स रोड्रिग्स इंजिनीअरिंग एलएलपी
पीएमसी व सल्लागार स्थापत्य अभियंता
मोबाईल नं.: ९८३३२८३४७५ / ८५९१७४०८२


# ट्रक चालकांनाही ८ तास ड्युटी सरकार नव्या धोरणाच्या तयारीत

■ नवी दिल्ली

केंद्र सरकार आता वैमानिकांप्रमाणे देशातील ट्रक चालकांनाही ८ तासांची ड्युटी लागू करण्याचे धोरण आखत आहे. दिवस-रात्र न थकता वाहन चालविण्याने ट्रक चालकांवर ताण येऊन अपघात घडतात. त्यामुळे केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी हे स्वतः या योजनेवर गांभीर्याने काम करत आहेत. केंद्रीय परिवहन मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ट्रक चालकांना आता पूर्ण झोपून व आराम करून ट्रक चालविण्याचे धोरण तयार केले जात आहे. कारण ट्रक चालक हे गाडीतील माल वेळेत पोहोचविण्यासाठी सलग २४ ते ४८ तास वाहन चालवतात. त्यांची झोप पूर्ण होत नसल्याने अपघाताची शक्यता असते. त्यामुळे आता ट्रक चालकांना ८ तासानंतर योग्य प्रमाणात विश्रांती देणे गरजेचे आहे.

# म्हसवड पालिकेच्या विरोधात कुटुंबाचे आमरण उपोषण

■ म्हसवड

सातारा जिल्ह्यातील म्हसवड नगरपरिषदेने एका लोहार कुटुंबाचे घर व जागा ही बेकायदेशीर ठरवत दोन दिवसांत राहते घर रिकामी करण्याची नोटीस दिली आहे. त्यामुळे नगर परिषदेने आमच्यावर अन्याय केला असल्याचा आरोप करत या कुटुंबाने पालिकेच्या विरोधात आमरण उपोषण सुरू केले आहे.

उपोषणास बसलेल्या लोहार कुटुंबियांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, आमचे कुटुंब १९७० सालापासून येथील हायस्कूल विद्यालयाशेजारी राहते. याठिकाणी आता आमच्या कुटुंबाची तिसरी पिढी राहत आहे. आमच्या कुटुंबाने १९९२ साली पालिकेकडे या जागेवरील आपल्या घराची नोंद करण्यासाठी अर्ज दाखल केलेला असूनही पालिकेने व भूमी अभिलेख कार्यालयाने आजवर त्याची नोंद केलेली नाही.

## गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी

निकाल | सोडत संध्या. 5:00

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 06 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 08/02/2025

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG-09 : 8955 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5650 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1072 | 1323 | 5602 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 7353 (विराग एन्टरप्रायझेस, नाशिक) | 7848 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| चौथे बक्षिस रु. 400/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2082 | 3047 | 3983 | 5155 | 5867 | 7110 | 7453 | 8118 |
| 1033 | 2239 | 3243 | 4004 | 5448 | 5954 | 7187 | 7472 | 8209 |
| 1044 | 2289 | 3300 | 4271 | 5552 | 6032 | 7238 | 7536 | 8257 |
| 1081 | 2374 | 3301 | 4462 | 5572 | 6250 | 7269 | 7749 | 8453 |
| 1166 | 2420 | 3355 | 4496 | 5587 | 6401 | 7294 | 7750 | 8488 |
| 1184 | 2538 | 3453 | 4617 | 5595 | 6506 | 7297 | 7850 | 8703 |
| 1231 | 2786 | 3563 | 4643 | 5660 | 6669 | 7309 | 7916 | 8870 |
| 1254 | 2853 | 3863 | 4847 | 5814 | 6866 | 7319 | 7949 | 8932 |
| 1687 | 2952 | 3882 | 4851 | 5861 | 6955 | 7437 | 7971 | 8993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • | सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 06 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 08/02/2025

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-01 : 3225 |


सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | |
|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5955 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 5300 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 5485 (महाराजा लॉटरी सेंटर, इचलकरंजी) | 5657 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1133 | 1818 | 3068 | 4227 | 5415 |
| 1151 | 2121 | 3131 | 4534 | 5524 |
| 1211 | 2236 | 3200 | 4590 | 5606 |
| 1241 | 2422 | 3539 | 4649 | 5745 |
| 1247 | 2551 | 3593 | 4694 | 5775 |
| 1329 | 2618 | 3633 | 5053 | 5886 |
| 1401 | 2790 | 3949 | 5095 | 5965 |
| 1408 | 2815 | 4195 | 5344 | 5969 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक


# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, रविवार ९ फेब्रुवारी, २०२५

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## ट्रम्प यांची कागदी स्ट्रॉवर बंदी



**वॉशिंग्टन** -शीतपेय पिण्यासाठी वापरण्यात येणारे कागदी स्ट्रॉ वाईट असून ते ताबडतोब बदलण्यासाठी आपण लवकरच एक आदेश पारित करणार असल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. शीतपेये वा इतर पेये पिण्यासाठी प्लॅस्टिकचे स्ट्रॉ वापरण्यात येत होते. मात्र प्लास्टिक वापरल्याने पर्यावरणाची हानी होत असल्याने माजी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन यांच्या प्रशासनाने या प्लॅस्टिक स्ट्रॉवर बंदी घालत त्याऐवजी कागदी स्ट्रॉच्या वापराला मंजुरी दिली. हे कागदी स्ट्रॉ व्यक्तीशः ट्रम्प यांना आवडत नाहीत. त्यामुळे कागदी स्ट्रॉच्या ऐवजी पुन्हा प्लॅस्टिकचे स्ट्रॉ वापरण्याला सुरुवात करण्याचे आदेश ते देणार आहेत.

# आपचा दारुण पराभव ! प्रमुख नेतेही पराजित

# केजरीवालना पराभवाचा धक्का! काँग्रेसला पुन्हा भोपळा

■ नवी दिल्ली

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने आपचा दारुण पराभव केला. भाजपाला २७ वर्षांनंतर दिल्लीची सत्ता पुन्हा मिळवण्यात यश आले आहे. मोदी यांना दिल्लीत आपचा कधीच पराभव करता येणार नाही, त्यांना दुसरा जन्म घ्यावा लागेल अशी गर्जना अरविंद केजरीवाल यांनी मारली होती. मात्र, या निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांचाच पराभव झाला. इतकेच नाही तर उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, सौरभ भारद्वाज, सोमनाथ भारती, दुर्गेश पाठक या आपच्या मोठ्या नेत्यांचाही पराभव झाला. आपच्या या पराभवानंतर त्यांच्याकडे केवळ पंजाबची सत्ता राहिली आहे. आता ती सत्ता हिसकावून घेण्याचा प्रयत्न भाजपा निश्चित सुरू करील. हरियाणा, महाराष्ट्र नंतर भाजपाला दिल्लीत आश्चर्यकारक विजय मिळाला आहे. यानंतर काही महिन्यात बिहार विधानसभा निवडणूक आहे. तिथेही भाजपा घवघवीत यश मिळवते का याकडे सर्वांचे लक्ष आहे.



**आपच्या** नेत्यांवर मद्य घोटाळ्याचा आरोप, त्यांचा तुरुंगवास, केजरीवाल यांचे शीशमहलसारखे निवासस्थान, धार्मिक लांगूलचालन, केंद्र सरकारशी सतत वाद असे मुद्दे भाजपाने निवडणुकीच्या प्रचारात वापरले. त्याचबरोबर आप सतत दहा वर्षे सत्तेत असल्याने लोकमत नवीन सरकारकडे वळू शकत होते. यामुळे बदललेल्या जनमताने भाजपाच्या पारड्यात सत्ता टाकली. या दारुण पराभवामुळे आपच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहणार आहे. केजरीवाल यांच्या प्रतिमेलाही तडे जाणार आहेत. हा पराभव झाल्यानंतर सर्वच विरोधक आणि विश्लेषक आपवर तुटून पडले. कालपर्यंत जे आप विरोधात बोलत नव्हते ते त्यांना रावण, दुर्योधन म्हणू लागले. केजरीवाल यांच्या एकाधिकारशाहीवर टीका करणारे भाजपात मोदींची हुकूमत, काँग्रेस पक्षात गांधी कुटुंब, तृणमूलमध्ये ममता बॅनर्जी अशी जवळजवळ प्रत्येक पक्षात निर्माण होणारी नेतृत्वाची एकाधिकारशाही विसरल्याचे दिसले. इंडिया आघाडीत एकत्र असूनही काँग्रेस आणि आपने ही निवडणूक वेगवेगळी लढवली. याचाही आपला फटका बसल्याचे म्हटले गेले. पण गेल्या तीन निवडणुका हे दोन पक्ष वेगळेच लढले आहेत आणि तरीही आप तीनवेळा विजयी झाला आहे.

काँग्रेसला तर सलग तिसऱ्यांदा दिल्लीत एकही जागा जिंकता आली नाही. ७० पैकी ६८ काँग्रेस उमेदवारांनी आपले डिपॉझिट गमावले आहे. त्यामुळे काँग्रेसचे आणखी किती अधःपतन व्हायचे आहे, असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. भाजपा विजयी झाल्याने भाजपाने या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात वापरलेली सत्ता आणि संपत्ती हे आपच्या पराभवाचे कारण असू शकते. या स्थितीतही आपने २२ जागांवर यश मिळवले. मात्र सत्ता गेल्यावर भविष्यात भाजपाशी दोन हात करणे आपला कठीण होणार आहे.

१९९३ मध्ये भाजपाची सत्ता होती तेव्हा भाजपाने ४९ जागा जिंकल्या होत्या. त्या काळात भाजपाने पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री बदलले होते. यावेळी भाजपाने ४८ जागा जिंकल्या » पान ४ वर

### मुख्यमंत्री कोण?

दिल्लीतील भाजपाच्या विजयानंतर आता मुख्यमंत्री कोण, याची चर्चा सुरू झाली आहे. यात प्रामुख्याने चार नावे आघाडीवर आहेत. अरविंद केजरीवाल यांचा पराभव करणाऱ्या प्रवेश शर्मा यांचे नाव सगळ्यात पुढे आहे. दिल्ली भाजपाचे नेते वीरेंद्र सचदेवा यांचे नावही चर्चेत आहे. सुषमा स्वराज यांच्या कन्या बांसुरी स्वराज यादेखील मुख्यमंत्री होऊ शकतात. त्या सध्या नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपाच्या खासदार आहेत. उत्तर-पूर्व दिल्ली मतदारसंघातील भाजपाचे खासदार मनोज तिवारी हेदेखील मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेत आहेत.

### आता मुंबई पालिका जिंकणार! आशिष शेलारांचा इशारा



आता आर्थिक राजधानीतही मुंबईकर असाच बदल घडवतील. २५ वर्षे मुंबई पालिकेत भ्रष्टाचार करणाऱ्यांना आम्ही घरी बसवणार असा इशारा माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी एक्सवर दिला आहे. राजकीय बांडगूळाला दिल्लीकरांनी फटकारले अशीही टीका त्यांनी दिल्लीतील निकालावरून आप आणि काँग्रेसवर केली. मंत्री आशिष शेलार यांनी एक्सवर पोस्ट करत लिहिले की, महाराष्ट्र जिंकलाच. आज राजधानी दिल्ली पण जिंकली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दारववत राष्ट्रवादी विचारधारेच्या बाजूने राजधानीने दणदणीत कौल दिला. सामान्य, कष्टकरी दिल्लीकरांचा मफलरने गळा घोटणाऱ्या आणि फसवणाऱ्या संधीसाधू राजकारणाची साफसफाई करून दिल्लीकरांनी झाडूला सत्तेबाहेर फेकले आहे. राहुल गांधी यांच्या काँग्रेसला तर मोठा भोपळा देऊन दिल्लीकरांनी त्यांना जागा दाखवली. ईव्हीएमला दोष देत आपले अपयश झाकण्याचा कार्यक्रम आता अजून जोरात करा. आता आर्थिक राजधानीतही मुंबईकर असाच बदल घडवतील. २५ वर्षे पालिकेत भ्रष्टाचार करणाऱ्यांना घरी बसवणार आहोत.

### एका कॉमन मॅनचा अस्त दुसरा कॉमन मॅन संकटात?

अरविंद केजरीवाल यांनी 'कॉमन मॅन' अशी आपली प्रतिमा निर्माण केली होती. जनतेच्या हितासाठी झगडणारा नेता म्हणून जनतेनेही त्यांना सलग तीन वर्षे निवडून आणले. पण त्यांचे आलिशान घर, मद्य घोटाळा याबाबत त्यांच्यावर आरोप झाल्यानंतर जनता त्यांच्या विरोधात गेली आणि त्यांचा अस्त झाला. आता महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे 'कॉमन मॅन' म्हणून जनतेपुढे आपले वेगळे व्यक्तिमत्त्व उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण महायुती सरकारमध्ये त्यांना सतत डावलले जात असल्याने तेही संकटात आहेत. एकनाथ शिंदे यांचे भवितव्य अंधूक असल्याचीच चर्चा आहे.

## थोडक्यात...

### मेहबूबा मुफ्ती आणि कन्या नजरकैदेत ठेवण्यात आले

**श्रीनगर-** जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती आणि त्यांची कन्या इल्तिजा मुफ्ती नजरकैदेत असल्याचा दावा स्वत: इल्तिजा

#### इल्तिजा मुफ्तीचा दावा

मुफ्ती यांनी केला. इल्तिजा यांनी घराच्या बंद दरवाज्यांवरील कुलूपांचा फोटो एक्सवर पोस्ट करत हा दावा केला आहे. इल्तिजा मुफ्तीने एक्स पोस्टवर लिहिले की, मला आणि माझ्या आईला घरात नजरकैदेत ठेवले आहे. आमच्या घराचे दरवाजे बंद आहेत. आम्हाला बाहेर जाण्याची परवानगी नाही. आईला सोपोरला जायचे होते जिथे वसीम मीरला सैन्याने गोळ्या घालून ठार मारले होते. मी आज मारवन दीनच्या कुटुंबाला भेटण्यासाठी कट्ठआला जाणार होते. पण आम्हाला जाऊ दिले नाही. निवडणुकीनंतरही काश्मीरमध्ये काहीही बदलले नाही.

### ना बहू मिली ना बहुमत परेश रावलांची टिप्पणी

**नवी दिल्ली -** दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपचा पराभव झाला असून, एकेकाळी दिल्लीत सत्तेत असलेल्या काँग्रेसला या निवडणुकीत एकही जागा मिळाली नाही. यावर अभिनेता व भाजपाचे माजी खासदार परेश रावल यांनी थेट सोनिया गांधी यांच्यावर धक्कादायक टिप्पणी केली आहे. त्यांनी म्हटले की, एका आईचे दु:ख तुम्ही समजून घेतले पाहिजे. त्यांना बहू मिळत नाही आणि त्यांना बहुमतही मिळत नाही.

### अहंकार रावण का भी नहीं बचा था!

**नवी दिल्ली -** दिल्ली विधानसभेत आम आदमी पक्षाच्या दारुण पराभवावर महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष व राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांनी

#### स्वाती मालीवालांची पोस्ट

एक्स अकाऊंटवर 'अहंकार रावण का भी नहीं बचा था' अशी पोस्ट केली आहे. त्याचबरोबर त्यांनी एक फोटो देखील पोस्ट केला आहे. ज्यामध्ये द्रौपदीचे वस्त्रहरण करतानाचे चित्र आहे. स्वाती मालीवाल यांनी हा फोटो पोस्ट करून त्यांच्या अपमानाची आठवण करून दिली अशी चर्चा समाज माध्यमांवर सुरू झाली आहे. काही महिन्यांपूर्वी स्वाती मालीवाल यांनी दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद

## जरांगेंचे शनिवारपासून पुन्हा बेमुदत उपोषण

■ जालना

**मनोज** जरांगे-पाटील शनिवार १५ फेब्रुवारीपासून पुन्हा अंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमच्या मागण्या तत्काळ मान्य करतील, असे भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्या मार्फत सांगितले होते, असा दावा आज पत्रकार परिषदेत मनोज जरांगे-पाटील यांनी केला.


मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, दस्तावेज अभ्यासासाठी अभ्यासकाची नियुक्ती करावी, गॅझेट लागू करावे, एसीबीसीच्या विषयावर निर्णय घेणे अशा पाच ते सहा मागण्या तत्काळ सोडविण्याचे



आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी आमदार सुरेश धस यांच्या मार्फत दिले होते. गोड बोलून उपोषण मागे घ्यायला लावायचे आणि नंतर एकही मागणी मान्य करायची नाही असे करून सरकारने आमची फसवणूक केली आहे. उपोषण सोडून १२ दिवस झाले तरी एकाही आश्वासनाची शासनाने पूर्तता केलेली नाही. त्यामुळे १५ फेब्रुवारीला पुन्हा अंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण करणार आहे. आज पावणेदोन वर्षांपासून देवेंद्र फडणवीस हेच गृहमंत्री आहेत. मराठा आंदोलनातील तरुणांवरील गुन्हे मागे घेतले नाहीत. आता हे चालणार नाही. धनंजय मुंडे यांच्यासारखी तुमची जी टोळी आहे, तिला पण फिरू देणार नाही. आमच्या समाजाचा अपमान करणार असाल तर तुम्हालाही आम्ही सोडणार नाही.

## जाण्याची वेळ झाली! अमिताभच्या पोस्टमुळे खळबळ

■ मुंबई




**अमिताभ** बच्चन कितीही व्यग्र असले तरीही सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात आणि चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी काल रात्री केलेल्या एका पोस्टमुळे मात्र खळबळ माजली आहे. जाण्याची वेळ झाली आहे, असे अमिताभ यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे चाहते चिंतीत आहेत. अमिताभ यांची पोस्ट व्हायरल होताच एका चाहत्याने लिहिले की, असे बोलू नका साहेब. दुसऱ्या चाहत्याने विचारले की, काय झाले साहेब? तुम्ही जे लिहित आहात त्याचा अर्थ काय? अमिताभ बच्चन यांनी ही पोस्ट कशा संदर्भात आहे याबाबत काहीही स्पष्ट केले नाही. त्यामुळे चाहते त्याचा संबंध त्यांच्या आरोग्याशी जोडत आहेत. तर काही लोक ते त्यांच्या नवीन चित्रपटाशी जोडत आहेत.

## उद्योगपती अनिल अंबानींना उच्च न्यायालयाचा दिलासा



■ मुंबई

**उद्योगपती** अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन कंपनीचे कर्ज खाते फसवे असल्याचे जाहीर करण्याच्या कॅनरा बँकेच्या आदेशाला काल उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

अनिल अंबानी यांच्या कंपनीने ८ नोव्हेंबर २०२४ रोजी घेतलेल्या कर्जाचा गैरवापर केल्याचा उल्लेख करत कॅनरा बँकेने कंपनीचे खाते 'फसवे खाते' म्हणून जाहीर करणारे आदेश काढले होते. या आदेशाला अंबानी यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आपली बाजू न ऐकताच बँकेने हा आदेश काढल्याचा दावा अंबानी यांच्यावतीने करण्यात आला होता. त्यासाठी अंबानी यांच्यातर्फे सर्वोच्च न्यायालयाच्या या बाबतच्या आदेशाचा दाखला देण्यात आला. त्याची दखल घेऊन न्यायमूर्ती

#### कॅनरा बँकेच्या 'फसवे खाते' आदेशाला दिली स्थगिती

रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने कॅनरा बँकेच्या आदेशाला स्थगिती दिली. यावेळी बँकेने केलेली ही कृती रिझर्व्ह बँकेच्या 'मास्टर सर्क्युलर' तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन करणारी असल्याचे निरीक्षण नोंदवले आणि बँकेचा आदेश रद्द केला.

## शिर्डीतील साईबाबा हिंदूच होते धर्मगुरु कालीचरण यांचा दावा

■ शिर्डी



**शिर्डी** येथील साईबाबा हे हिंदूच होते. त्यामुळे ते मुसलमान असल्याच्या प्रचाराला बळी न पडता हिंदूंनी त्यांची भक्ती करावी, असा दावा धर्मगुरु कालीचरण यांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये विशेष करून उत्तर भारतात साईबाबांच्या विषयी निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत त्यांनी हे मत व्यक्त केले आहे.

कालीचरण यांनी म्हटले आहे की, साईबाबा हे कट्टर हिंदू होते. त्याचे प्रमाण मी दिलेले आहे. जन्म व कर्माने साईबाबा हिंदू होते. हिंदू संस्कार व परंपरेत साईबाबांचा जन्म झाला. तेव्हा हिंदूंनी साईबाबांविषयी निर्माण केलेल्या संशयाला थारा देऊ नये व साईबाबांची भक्ती करावी. उत्तर प्रदेशातील काही शहरांमध्ये साईबाबांच्या धर्मावरून वाद निर्माण झाला होता.

## मिल्कीपूर पोटनिवडणुकीतही भाजपा उमेदवाराचा विजय

■ मिल्कीपूर

**उत्तर** प्रदेशातील मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीतही भाजपा उमेदवाराचा विजय झाला. भाजपाने लोकसभा निवडणुकीतील अयोध्या मतदारसंघाच्या पराभवाचा वचपा काढला आहे. समाजवादी पक्षाचे मिल्कीपूरचे आमदार अवधेश प्रसाद लोकसभेत विजयी होऊन खासदार झाल्यामुळे ही जागा रिक्त झाली होती.

मिल्कीपूरमध्ये अवधेश प्रसाद यांचा मुलगा अजित प्रसाद यांना समाजवादी पार्टीने उमेदवारी दिली होती. भाजपाने ही निवडणूक प्रतिष्ठेची करत चंद्रभान पासवान यांना उमेदवारी दिली. या निवडणुकीच्या प्रचाराची धुरा व्यक्तीशः योगी आदित्यनाथ यांनी सांभाळली होती. अखिलेश यादव यांनी ही निवडणूक जिंकणार असल्याचा दावा केला होता. मात्र त्याचा परिणाम झाला नाही. भाजपाचे चंद्रभान पासवान यांनी मतमोजणीत सुरुवातीपासूनच आघाडी घेतली होती.

## इंग्रजी टाळा परंपरागत कपडेच घाला सरसंघचालक मोहन भागवतांचा सल्ला



■ नागपूर

**स्वातंत्र्यानंतर** देशाने नेहरूंच्या नेतृत्वाखाली विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरली असली तरी सरसंघचालक मोहन भागवत यांनी देशातील तरुण पिढीला इंग्रजी भाषा टाळण्याचा सल्ला दिला आहे. आधुनिक वेशभूषेऐवजी परंपरागत कपडे वापरावेत तसेच केवळ देशांतर्गत पर्यटन स्थळांनाच भेट द्यावी असेही त्यांनी म्हटले आहे. मोहन भागवत काल केरळमधील पथनमथ्थीटाच्या चेरुकोलपुझ्झा येथील ११३ व्या धार्मिक परिषदेतील हिंदू एकता संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, हिंदू कुटुंबांनी आठवड्यातून एकदा एकत्र येऊन आपल्या जीवनशैलीविषयी चर्चा केली पाहिजे. आपली भाषा, आपली वेशभूषा व आपल्या पर्यटनाची ठिकाणे आपल्या परंपरेशी निगडीत असली पाहिजेत. आपण आपल्या स्वतःच्या विभागात फिरले पाहिजे. आपल्या कोणत्या बांधवाला आपली गरज आहे का याचा विचार केला पाहिजे. कोणत्याही कार्यक्रमात जाताना आपला परंपरागत पोशाख केला पाहिजे. हिंदुत्व हे सत्य, करुणा, आरोग्य आणि ध्यान यावर असून, हिंदू धर्माच्या मूलभूत चौकटीत जाती व्यवस्थेवर आधारित उच्चनीचतेला जागा नाही. जे धर्माचे पालन करतात त्यांनी कोणताही संकोच न बाळगता जातीव्यवस्था सोडायला हवी. जगात सर्वत्र धार्मिक संघर्ष आहे कारण प्रत्येकाला आपला धर्म इतरांपेक्षा मोठा आहे हे दाखवायचे आहे.

## धारावी प्रकल्पाच्या श्रीनिवास यांची बेस्ट महाव्यवस्थापकपदी निवड वादात



■ मुंबई

**बेस्ट** उपक्रमाच्या महाव्यवस्थापकपदाचा अतिरिक्त कार्यभार १९९१ च्या तुकडीचे आयपीएस अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. काल त्यांनी आपला पदभार स्वीकारला. मात्र, ते अदानी समूह करत असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) असल्याने त्यांच्या नियुक्तीवरून वाद निर्माण झाला आहे. बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी मार्च २०२४ मध्ये अनिल डिग्गीकर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कुर्ला बेस्ट बस अपघातानंतर डिग्गीकर यांची १५ डिसेंबर २०२४ रोजी तडकाफडकी बदली करण्यात आली होती. त्यानंतर काही दिवस महाव्यवस्थापक पद रिक्त होते. त्यानंतर डॉ. हर्षदीप कांबळे यांची महाव्यवस्थापक पदावर नेमणूक झाली. कांबळे यांनी महाव्यवस्थापक पदाचा कार्यभारच स्वीकारला नव्हता. अखेर आता या पदाचा अतिरिक्त कारभार श्रीनिवास यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. त्यांनी मेट्रो रेल्वे प्रकल्प, मुंबई ट्रान्स हार्बर सी लिंक, शहरी पाणीपुरवठा प्रकल्प बोगदे आणि उन्नत रस्ते, नगर नियोजन, मुंबई आणि इतर शहरांतील परवडणारी गृहसंकुले इत्यादी प्रकल्पांमध्ये महत्त्वाची जबाबदारी सांभाळली आहे. आंतरराष्ट्रीय निधी एजन्सी आणि जागतिक कॉर्पोरेट्स संस्थांमध्येही त्यांनी काम केलेले आहे. मात्र, बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापकपदी झालेली त्यांची निवड वादात सापडली आहे. श्रीनिवास हे धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत, हे ठाऊक असूनही त्यांना बेस्टचा अतिरिक्त अधिभार देणे हा केवळ योगायोग नाही, अशी जोरदार चर्चा बेस्टच्या वर्तुळात सुरू आहे. या चर्चेमागे अदानीला हवी असलेली धारावी व काळा किल्ला बेस्ट डेपोची जागा असल्याचे म्हटले जात आहे. » पान ४ वर

## आरोपी सुदर्शन घुलेच्या मोबाईलचा डेटा शोधला! धनंजय देशमुखांची माहिती

■ बीड



**सरपंच** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले यांच्या मोबाईलमधील डेटा रिकव्हर करण्यात आला आहे. तर दुसरा विष्णू चाटे याचा मोबाईल सापडला नसला तरी त्यातील डेटादेखील सीआयडीने शोधला आहे. त्यातून महत्त्वाची माहिती मिळाली आहे. पण तपासाबाबत गोपनीयता पाळायची आहे. त्यामुळे ती माहिती दिली जात नाही. मात्र, तपास समाधानकारक सुरू असल्याचे संतोष देशमुखांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी सांगितले.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिने पूर्ण होत आहेत. सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सीआयडी अधिकारी अनिल गुजर यांची भेट घेऊन संतोष देशमुख हत्या प्रकरणासंदर्भातील तपासाची संपूर्ण माहिती घेतली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, या तपासात अडचण ठरणाऱ्या गोष्टींबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस भूमिका घ्यावी आणि देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा, अशी आमची मागणी आहे.



# नंदुरबार जिल्ह्याची दुखरी नस

**विकास** आणि प्रगतीच्या घोषणा आपण नेहमीच ऐकत असतो. परंतु या विकासाची नाळ नेमकी कुठे आणि कोणाशी जुळलेली आहे, हे अजूनही पुरते स्पष्ट होत नाही. मोठी महानगरं, शहरं, त्यांना जोडणारे चौपदरी, आठ पदरी समृद्धीवाले रस्ते, शहरांमधला चकचकाट आणि लखलखाट, उद्योगासाठी दिल्या जाणाऱ्या सरकारी सवलती, नव्याने होत असलेली उद्योगांची गुंतवणूक या सगळ्या गोष्टी म्हणजे विकास असा एकतर्फी असलेला आत्मविश्वास धोकादायक म्हणावा लागतो. भारताला विकसित होण्याची घाई झालेली आहे. किंबहुना तशी घाई केल्याशिवाय २०४७ पर्यंत भारत विकसित होणारही नाही. परंतु विकासाचे लाभार्थी नेमके कोण असावेत किंवा त्यांच्यापासूनच जर विकासाची गंगा सुरू झाली तरच विकसित भारताचा महाकुंभ साजरा करता येतो. अगदी परंपरेने भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि त्यातला साठ ते सत्तर टक्के समाज हा खेड्यात राहतो. त्यातही दहा-पंधरा टक्के समाज पूर्णपणे आदिवासी पाड्यांमध्ये किंवा डोंगरदऱ्यांमध्ये निवास करतो. आणि अशा या खेड्यापाड्यांपर्यंत विकासाचे लाभ अपेक्षेप्रमाणे पोहोचलेले नाहीत. चाळीस वर्षांपूर्वी जी परिस्थिती होती त्यात थोडाफार बदल झालेला आहे. तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून होत असलेली रस्ते, पाणी, विजेची सुविधा ही जरी गृहित धरली तरी ती शहरं, नगरांपुरतीच केंद्रीत होत असताना पाहायला मिळते. म्हणूनच गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून आदिवासी भागांमध्ये ठाण मांडून असलेली कुपोषणाची किंवा त्या भागात होणाऱ्या बालमृत्यूंची परिस्थिती बघितली तर विकासापासून वंचित असलेल्यांची कहाणी अजूनही कायम असल्याचेच म्हणावे लागते. अलिकडेच शासनाच्याच एका आकडेवारीतून नंदूरबार जिल्ह्यात गेल्या आठ वर्षांत तब्बल साडेपाच हजार बालमृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. हा आकडा अतिशय धक्कादायक ठरतो. केवळ सोयीसुविधांचा अभाव आणि शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष म्हणजेच शासकीय सेवासुविधांची उदासीनता हीच या बालमृत्यूचे कारण ठरते.

**विकसित महाराष्ट्राचे कुपोषित आदिवासी**

नंदूरबार जिल्ह्याची निर्मिती होऊन सत्तावीस वर्षे झाली म्हणजे ज्या कारणासाठी धुळे जिल्ह्याचे विभाजन केले. आणि नंदुरबार, शहादा, अक्कलकुवा, धडगाव या सगळ्या भागातल्या आदिवासी परिसराचा विकास व्हावा. वर्षानुवर्षे मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या आदिवासींच्या किमान गरजांची पूर्तता व्हावी हा त्यामागचा उद्देश होता. परंतु साडेपाच हजारांवर झालेले हे बालमृत्यू म्हणजे नंदूरबार जिल्हा निर्मितीलाच अपयश आल्याचे सिद्ध करणारे आहे. जिल्हा झाला म्हणजे राजकारण्यांची सोय झाली. पदे वाढली, सरकारी कार्यालयांची संख्या वाढली. सरकारी तिजोरीतून ज्यादा निधीचे वाटपही झाले. परंतु ज्या विकासकामांसाठी तो निधी दिला गेला, ती विकासकामेच नंदुरबारसारख्या जिल्ह्यात होऊ शकलेली नाहीत. अगदी गेल्या आठवड्यातच गरोदर आदिवासी महिलेला घेऊन जात असतानाच त्यात नवजात बालकाचा मृत्यू होण्याची घटना घडली. अगदी गेल्या २०२४ मध्येसुद्धा एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांत एक ते सहा वर्षे वयोगटातल्या ४४२ बालकांचा मृत्यू झाला. याचा अर्थ बालमृत्यूंची ही दुर्दैवी शृंखला अजूनही थांबायला तयार नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चांगल्या रस्त्यांची वानवा आणि अतिशय निकृष्ट असलेल्या आरोग्य सेवांचा हा सर्वात मोठा दुष्परिणाम ठरतो. रस्तेच नीट नसल्याने महिलांना प्रसूतीसाठी घेऊन जाणेसुद्धा खूप कष्टदायक ठरते. शिवाय आरोग्य केंद्रात गेल्यानंतर तातडीने उपचार मिळण्याची खात्री नसते. तिथे नियुक्त झालेले डॉक्टर वेळेवर उपलब्ध होतीलच याचीही खात्री देता येत नसते. अनेकवेळेला तर औषधांचा पुरेसा साठाही उपलब्ध नसतो. आरोग्य केंद्रांच्या इमारती बाहेरून दिसायला चांगल्या वाटतात. परंतु आतमध्ये सोयीसुविधांचा प्रचंड अभाव असतो. अशा परिस्थितीत वर्षानुवर्षे आयुष्य कंठणारे आदिवासी आणि विकसित भारताचे स्वप्न पाहणारे राज्यकर्ते यांच्या ध्येयधोरणांचा कुठे मेळच बसत नाही असे म्हणावे लागते. म्हणजे एकाअर्थी विकसित भारताचे हे कुपोषित आदिवासी असेच त्याचे वर्णन करावे लागते. शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या कुपोषित असतात असे नव्हे तर अशुद्ध पाणी, अनारोग्य, अस्वच्छता, रस्ते, वीज अशा महत्त्वाच्या सुविधांपासूनही ते एकाअर्थी कुपोषितच राहतात.

**उदासीनतेची मोठी किंमत**

सरकारचे सध्या चंद्रपूर, गडचिरोलीकडे विशेष लक्ष दिसते. परंतु लक्ष दिल्यानंतर तिथल्याही आदिवासी भागाचे परिवर्तन घडते. हे उदाहरण म्हणून तरी लक्षात घ्यायला हवे. अजूनही ठाणे जिल्ह्यातील पालघर, डहाणू, वाडा, मोखाडा किंवा नाशिक जवळच्या हरसूल, पेठ, सुरगाणा आणि धुळे जिल्ह्यातल्या अक्कलकुवा तोरणमाळ. धडगाव या भागातली दुरवस्था दयनीय स्वरूपाचीच आहे. म्हणजेच सरकारी यंत्रणांचे दुर्लक्ष आणि त्याची हजारो शेतकऱ्यांना मोजावी लागणारी भयंकर किंमत अत्यंत वेदनादायक ठरते. समाजातल्या सर्व घटकांना किमान आणि समान सोयीसुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत, हे अगदी संविधानाचेच अभिवचन आहे. परंतु त्याची अंमलबजावणी करताना भेदभाव केला जातो. आदिवासी विभाग म्हटल्यानंतर काहीसा सापत्नपणाचाच भाव शासकीय यंत्रणांमध्ये पाहायला मिळतो. त्या त्या जिल्ह्याला असलेले राजकीय नेतृत्वसुद्धा आदिवासींविषयी स्वार्थी आणि बेगडी प्रेम दाखवणारे आहे. जर नेतृत्वाकडे आदिवासींविषयी प्रेम किंवा कणव असती तर इतक्या मोठ्या संख्येने कुपोषण किंवा बालमृत्यू झालेच नसते. अंदाजपत्रकांमधून कोट्यवधी रुपयांची तरतूद केली जाते. ही रक्कम खर्च झाल्याचेही दाखवले जाते. पण सोयीसुविधा त्याप्रमाणात अस्तित्वात आलेल्या नसतात. नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषणाची आणि बालमृत्यूची दुखरी नस वर्षानुवर्षे ठसठसते आहे. सरकारी यंत्रणांच्या संवेदनहीनतेचाच तो सर्वात मोठा परिपाक ठरतो. शहरांमधल्या मुलांना मिळणाऱ्या सोयीसुविधा आणि त्या तुलनेत आदिवासी भागातल्या मुलांवर होणारा अन्याय भीषण स्वरूपाचाच ठरतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**उपकार जरी फेडता आले नाही तरी चालेल,
पण जाणीव मात्र आयुष्यभर ठेवावी.**

## पंचांग

**रविवार, ९ फेब्रुवारी, २०२५**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**

**माघ शुक्ल द्वादशी**
**नक्षत्र : आर्द्रा**

**रवी उदय- ०७-११**
**रवी अस्त- १८-३५**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मिथुन**

**भीष्म द्वादशी, संतान द्वादशी, ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज जयंती**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### पनीर लॉलीपॉप



★ **साहित्य -** १ कप पनीर, २ उकडलेले बटाटे, २ हिरव्या मिरच्या, १/२ शिमला मिर्ची, १ चमचा आले, १ चमचा लसूण, १/२ चमचा जिरा पावडर, १/२ चमचा गरम मसाला पावडर, १/२ चमचा चाट मसाला, १/४ वाटी चिरलेली कोथिंबीर, मीठ स्वादानुसार, लाल मिरची पावडर स्वादानुसार, १ कप ब्रेड क्रम्स, १ /२ कप मैदा

★ **कृती -** पनीर लॉलीपॉप बनवण्यासाठी प्रथम ताजे पनीर आणि उकडलेले बटाटे घ्या. या दोन्ही गोष्टी किसून घ्या आणि एका भांड्यात काढा. चमच्याच्या मदतीने ते चांगले मिसळा. यानंतर शिमला मिरची नीट धुवून बारीक चिरून घ्यावी. आता किसलेले पनीर आणि बटाटे यामध्ये चिरलेली शिमला मिरची आणि सर्व मसाले घालून मिक्स करा. यानंतर, मिश्रण १० मिनिटे झाकून ठेवा आणि सेट करण्यासाठी ठेवा.

ठराविक वेळानंतर तयार मिश्रणाचे छोटे गोळे करून बाजूला ठेवा. यानंतर एका भांड्यात मैदा आणि पाणी एकत्र करून पातळ पीठ तयार करा. ब्रेडचे तुकडे दुसऱ्या प्लेटवर पसरवून ठेवा. आता गोळे प्रथम पिठाच्या द्रावणात बुडवा आणि नंतर ब्रेड क्रम्सने गुंडाळा. त्याचप्रमाणे सर्व गोळे तयार करा. कढईत तेल टाकून गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात सर्व गोळे टाका आणि सोनेरी होईपर्यंत तळा. यानंतर मधोमध टूथ पिक किंवा स्टिक ठेवा आणि चटणीसोबत सर्व्ह करा.



# अजिंक्य रहाणे आणि सूर्यकुमार यादव अपयशी

## मुंबईच्या ८ बाद २७८ धावा! हरियाणाचे गोलंदाज चमकले

**कोलकात्यातील ईडर्न गार्डन्सवर आजपासून सुरू झालेल्या रणजी कसोटी ट्रॉफीच्या तिसऱ्या क्वार्टर फायनल सामन्यात हरियाणाच्या गोलंदाजांनी गतविजेत्या मुंबईच्या फलंदाजांना गुडघे टेकण्यास भाग पाडले. पहिल्या दिवसाअखेर मुंबईने ८ बाद २७८ धावा केल्या. शम्स मुलानीने १० चौकारांसह सर्वाधिक ९१ धावा ठोकल्या. मात्र अजिंक्य रहाणे आणि सूर्यकुमार यादव फलंदाजीत अपयशी ठरला.**



■ कोलकाता

सामन्यात टॉस जिंकून मुंबईने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणेचा हा निर्णय खूपच निरुपयोगी ठरला. कारण हरियाणाच्या अंशुल कंबोजच्या घातक गोलंदाजीसमोर मुंबईच्या फलंदाजांना संघर्ष करावा लागला. मुंबईच्या अर्ध्याहून अधिक संघ १०० धावांचा टप्पा गाठण्यापूर्वीच पॅव्हेलियनमध्ये परतला. टॉप ऑर्डरचे तिन्ही फलंदाज १४ धावांवर बाद झाले. तिघेही क्लीन बोल्ड झाले. अजिंक्य रहाणेने काही काळ एका टोक रोखले. परंतु सुमित कुमारने त्याला ३१ धावांवर क्लीन बोल्ड केले. २५ धावा होईपर्यंत मुंबई संघाने ४ विकेट गमावल्या होत्या. अजिंक्य रहाणे आणि शिवम दुबे यांच्यात ४० धावांची छोटी भागीदारी झाली. पण दुबे जास्त काळ खेळपट्टीवर राहू शकला नाही. तो २८ धावा करून बाद झाला. ९४ धावसंख्येपर्यंत मुंबई संघाने ६ विकेट गमावल्या. भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवही ९ धावा करून बाद झाला. शम्स मुलानी (९१ )आणि तनुश कोटियनने (८५ नाबाद) यांनी १६५ धावांची भागिदारी करत मुंबईच्या संघाला समाधानकारक स्थितीत नेले. दिवसाअखेर तनुश कोटियन आणि मोहित अवस्थी नाबाद पॅव्हेलियनमध्ये परतले. त्यावेळी मुंबईच्या संघाने ८ बाद २७८ धावा केल्या होत्या.

## आरसीबीच्या फिरकी प्रशिक्षकपदी साईराज बहुतुले यांची नियुक्ती

■ जयपूर



माजी भारतीय फिरकी गोलंदाज साईराज बहुतुले यांची राजस्थान रॉयल्सच्या (आरसीबी) फिरकी प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. याआधीही साईराज बहुतुले यांनी राजस्थान रॉयल्ससोबत काम केले. सध्या तो बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये काम करत आहे. परंतु लवकरच तो राजस्थान रॉयल्समध्ये सामील होईल. जेव्हा राहुल द्रविड भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक होता. तेव्हा साईराज बहुतुले यांनी भारतीय संघासोबत फिरकी सल्लागार म्हणून काम केले. याशिवाय, साईराज बहुतुले यांनी राजस्थान रॉयल्ससोबत ४ हंगाम काम केले. तो आयपीएल २०१८च्या हंगामापासून आयपीएल २०२१ पर्यंत राजस्थान रॉयल्सशी संबंधित होता. तर साईराज बहुतुलेने १९९७ मध्ये श्रीलंकेविरुद्ध भारताकडून पदार्पण केले.

## संझगिरींची आज आदरांजली सभा

■ मुंबई - क्रीडा समीक्षक द्वारकानाथ संझगिरींच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी रविवारी ९ फेब्रुवारीला सायंकाळी ५ वाजता दादरच्या सूर्यवंशी क्षत्रिय सभागृहात आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले. ही सभा सर्वांसाठी खुली ठेवण्यात आली आहे. 'पप्पू' या टोपण नावाने मित्रांमध्ये, चाहत्यांमध्ये प्रसिद्ध असलेल्या संझगिरींनी आपल्या ५ दशकांच्या लेखन प्रवासात हजारो लेख, शेकडो संगीताचे प्रयोग, शेकडो एकपात्री कार्यक्रम आणि ४० पुस्तकांचा खजिना आपल्या चाहत्यांना दिला. आपले सारे आयुष्य मनमुरादपणे जगलेल्या या 'अवलिया'विषयी गेल्या २ दिवसांत हजारो चाहत्यांनी, मित्रांनी सोशल मीडियावर भन्नाट आठवणी आणि किस्से व्यक्त केले.

## पोलीस क्रिकेट संघ प्रशिक्षकपदी संदेश चव्हाण

■ सिंधुदुर्ग - सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली आयनल मणेरवाडी गावचा पुत्र संदेश सूर्यकांत चव्हाण यांची महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झाली. नवी दिल्लीतील भारतीय पोलीस क्रीडा मंडळाच्या वतीने सुरत येथे होणाऱ्या क्रिकेट स्पर्धेसाठी ही निवड झाली. ग्रामीण भागात टेनिस बॉल क्रिकेट खेळता खेळता इतकी उंची गाठणाऱ्या संदेशने आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपला कामगिरीचा ठसा उमटविल्याबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## महिमा ठुकरूल आणि चिंतन पाटील मल्लखांब स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू

■ मुंबई

मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटनेच्या मान्यतेने आणि आरंभ स्पोर्ट्स, मोरया मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या मल्लखांब स्पर्धेत विलेपार्ले पूर्वच्या श्री पार्लेश्वर व्यायामशाळेचा चिंतन पाटील (८ गुण )आणि दहिसरमधील शैलेंद्र एज्युकेशन सोसायटीची महिमा ठुकरूल (७.७६ गुण) सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. सर्वसाधारण विजेतपद (पुरुष) दहिसर स्पोर्ट्स फाऊंडेशन (११५.०२ गुण) आणि सर्वसाधारण विजतेपद (महिला) कांदिवलीच्या समता क्रीडा भवनाला (९५.४७ गुण) प्रदान करण्यात आले. ही स्पर्धा कांदिवलीच्या सेक्टर ४ मधील आरंभ स्पोर्ट्स येथे आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन मल्लखांब खेळातील पद्मश्री पुरस्कार विजेते उदय देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धा प्रमुख मंदार आसेगांवकर व स्पर्धा सचिव नीलम राणे यांनी कामकाज पाहिले. गट ८ वर्षे -(मुले) सार्थक भागणे, रियांश केसरकर, कैवल्य चव्हाण. (मुली)मोक्षा घडवाले, शिवाई पवार, परीहा कराडकर. गट १० वर्षे (मुले)- अविरत कोकणे, तनिष गमरे, रेयांश संखे. (मुली) जैना रजक, किमया भोईर, दिया हातीम, गौरी माणगावकर.

## प्रणय, कमलेश, सिद्धेश दुसऱ्या फेरीत दाखल

■ मुंबई

१६ व्या शिवाजी पार्क जिमखाना राज्य मानांक कॅरम स्पर्धेला पुरुष एकेरी गटाने सुरुवात झाली. उद्घाटनाच्या सामन्यात मुंबई उपनगरच्या प्रणय जाधव, मुंबईच्या कमलेश राठोड व पालघरच्या प्रताप सावंतने आपले सामने जिंकून दुसरी फेरी गाठली. स्पर्धेचे उद्घाटन मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सचिव अभय हडप यांच्या हस्ते करण्यात आले. उद्या दुपारी महिला एकेरीचे सामने खेळविले जाणार आहेत. याप्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष जितेंद्र शहा, मानद सचिव अरुण केदार, उपाध्यक्ष यतिन ठाकूर, मंजूर अहमद खान, प्रदीप भाटकर, खजिनदार अजित सावंत, सहसचिव केतन चिखले, योगेश फणसळकर तसेच जिमखान्याचे ट्रस्टी प्रकाश नायक, वाईस चेअरमन विश्वास नेरुरकर, कार्ड विभाग सचिव अजय पाटणकर, खजिनदार सी. ए. विलास सोमण, सहसचिव सुनील रामचंद्रन, इनडोअर सचिव सनिल समेळ व कॅन्टीन सचिव आशुतोष जोगळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## रुपाली ज्वेलर्स, स्कोडा ऑटो, प. रेल्वे अजिंक्य

■ मुंबई

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत पुरुष शहर विभागात रुपाली ज्वेलर्स, पुरुष ग्रामीण विभागात स्कोडा ऑटो आणि महिला विभागात पश्चिम रेल्वे अजिंक्य ठरले आहेत.

पुरुष शहर विभागात रुपाली ज्वेलर्स आणि इन्शुअरकोट स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात २५-२४ अशी अटीतटीची लढत बघायला मिळाली. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून संयमी खेळ दाखवत स्पर्धेची चुरस अखेरपर्यंत कायम ठेवली. पहिल्या डावात रुपाली ज्वेलर्सने १०-९ अशी एका गुणाची आघाडी मिळवली. दुसऱ्या डावात इन्शुअरकोटने गुणांचा पाठलाग करण्यासाठी कडवी झुंज दिली. परंतु रुपाली ज्वेलर्सने सावध खेळ दाखवत १५-१५ गुणांवर हा डाव संपवत स्पर्धेवर अवघ्या एका गुणाच्या फरकाने आपले अजिंक्यपद सिद्ध केले. पुरुष ग्रामीण विभागातही छत्रपती संभाजी नगरच्या स्कोडा ऑटो आणि कोल्हापूरच्या भोगावती सहकारी साखर कारखाना कडवी झुंज बघायला मिळाली. सलग ५ वर्षे विजेतेपद पटकावलेल्या जेएसडब्ल्यु डोलवी संघाला गारद केलेला भोगावती सहकारी साखर कारखान्याचा संघ स्कोडा ऑटोपुढे मात्र टिकाव धरू शकला नाही. पहिल्या डावात स्कोडा ऑटोने १७-१२ अशी ५ डावांची आघाडी घेतली तर दुसऱ्या डावातही १५-१३ अशी २ गुणांची आघाडी घेत ७ गुणांच्या फरकाने स्पर्धा जिंकली. महिला विभागात पश्चिम रेल्वे आणि ठाणे महानगरपालिका यांच्यात कडवी झुंज बघायला मिळाली. पहिल्या डावात पश्चिम रेल्वेने सोनाली शिंगटे खोलवर चढाया आणि राजाराणीच्या उत्कृष्ट पकडीच्या रोजावर १६-१३ अशा ३ गुणांची आघाडी घेतली.

## महिला क्रिकेट स्पर्धेत वेंगसरकर फाऊंडेशन विजेता

■ मुंबई



क्रिकेटपटू स्व.प्रकाश पुराणिक स्मृती चषक महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनने विजेतेपद पटकाविले. निर्णायक सामन्यात दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनने सलामी फलंदाज सारा सामंत (४५ धावा) व कप्तान पूनम राऊत (नाबाद ४७ धावा) यांच्या आक्रमक फलंदाजीमुळे एमआयजी क्रिकेट क्लबचा ८ विकेटने पराभव करून अजिंक्यपदाला गवसणी घातली. माहीम ज्युवेनाईल स्पोर्ट्स क्लब व शिवाजी पार्क जिमखाना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतिम सामन्यात दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनने नाणेफेक जिंकून एमआयजी क्रिकेट क्लबला प्रथम फलंदाजी दिली. प्रारंभ २ बाद १५ धावा असा निराशाजनक होऊनही मिताली म्हात्रे (५२ चेंडूत ५२ धावा, ५ चौकार) व महेक मिस्त्री (३० चेंडूत २७ धावा, ४ चौकार) यांनी डाव सावरला. त्यामुळे एमआयजी क्लबने मर्यादित २० षटकांत ६ बाद १२० धावांचा टप्पा गाठला. मध्यमगती गोलंदाज सिध्दी पवारने २६ धावांत ३ बळी घेतले. सलामी फलंदाज सारा सामंत (२२ चेंडूत ४५ धावा,९ चौकार) व अष्टपैलू पूनम राऊत (३४ चेंडूत नाबाद ४७ धावा, ८ चौकार) यांच्या फटकेबाजीमुळे दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनने विजयी लक्ष्य १३.५ षटकात २ बाद १२३ धावा झळकावून साध्य केले. परिणामी एमआयजी क्रिकेट क्लबला अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्यातील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार वेंगसरकर फाऊंडेशनची कप्तान पूनम राऊतने पटकाविला.


शिवसेना
09 फेब्रुवारी
अनाथांचा नाथ, गरिबांची साथ
प्रगतीचा हाथ, एकनाथ..!
महाराष्ट्र राज्याचे
उपमुख्यमंत्री
मा. श्री.
एकनाथजी
शिंदे
साहेब आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
*शुभेच्छुक*
मा.गुलाबराव पाटील
मंत्री,पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्रालय महाराष्ट्र शासन
मा.दादाजी भूसे
मंत्री,शालेय शिक्षण मंत्रालय महाराष्ट्र शासन
मा.उदय सामंत
मंत्री, उद्योग व मराठी भाषा मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.संजय राठोड
मंत्री, मृद व जलसंधारण मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.शंभूराज देसाई
मंत्री, पर्यटन व खनिकर्म ,माजी सैनिक कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.संजय शिरसाट
मंत्री,सामाजिक न्याय व कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.भरत गोगावले
मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमि विकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.प्रताप सरनाईक
मंत्री परिवहन मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.प्रकाश आबिटकर
मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र शासन
मा.योगेश कदम
राज्यमंत्री गृह, महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण व औषध प्रशासन महाराष्ट्र शासन
ॲड.आशिष जयस्वाल
राज्यमंत्री वित्त, नियोजन ,कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय कामगार मंत्रालय महाराष्ट्र शासन
शिवसेना,भाजपा,राष्ट्रवादी,रिपाइं व मित्रपक्ष तसेच महायुतीमधील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते

देश विदेश

# इस्त्रोच्या क्रायोजेनिक इंजिनच्या व्हॅक्युम इमिग्रेशनची चाचणी यशस्वी

■ महेंद्रगिरी



भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रोने काल त्यांच्या क्रायोजेनिक इंजिनच्या वॅक्यूम इमिग्रेशनची चाचणी केली असून ही चाचणी यशस्वी ठरली आहे. गगनयान मोहिमेसाठी ही चाचणी अत्यंत महत्त्वपूर्ण समजली जात आहे. इस्त्रोच्या तामिळनाडूच्या महेंद्रगिरी येथील इस्त्रो प्रॉपल्शन विभागात ही चाचणी घेण्यात आली. इस्त्रोने म्हटले की, अंतराळातील पोकळीत व्हॅक्युम स्थितीत मल्टी एलिमेंट इग्नायटरसह एलवीएम ३ ला उच्चत्तम श्रेणीची ऊर्जा देणाऱ्या स्वदेशी सीई२० या क्रायोजेनिक इंजिनचे प्रज्वलन यशस्वीरित्या पूर्ण केले. गगनयान मोहिमेसाठी हे परीक्षण महत्त्वपूर्ण असून, या मोहिमेत भारत पहिल्यांदा अंतराळात मानव पाठवणार आहे. अंतराळात उड्डाण करताना क्रायोजेनिक इंजिनला दुसऱ्यांदा सुरू करणे आव्हानात्मक असते.

# बिलासपुरात विषारी दारू पिऊन ७ जणांचा मृत्यू

■ बिलासपूर

छत्तीसगडमधील बिलासपूरच्या कोनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोफांडी येथे विषारी दारू पिऊन ७ जणांचा मृत्यू झाला. तर ४ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. बुधवारी एका व्यक्तीचा मृत्यू झाला. त्यानंतर २ लोकांचा मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू आजारपणामुळे झाल्याचे समजून त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यानंतर काल रात्री ४ जणांचा एकाच वेळी मृत्यू झाला. ते अनेक दिवसांपासून मोहाची दारू पित असल्याची माहिती मिळाली.मृत्यूचे कारण शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर स्पष्ट होणार आहे.

# ... तर आम्ही जोरदार प्रत्युतर देऊ इराणचा अमेरिकेला इशारा



■ तेहरान

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांनी आज अमेरिकेच्या धमक्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला. तसेच, 'अमेरिकेने काही चुकीचे पाऊल उचलले, व आमच्या देशाच्या सुरक्षेत अडथळा आणला, तर आम्ही देखील जोरदार प्रत्युत्तर द्यायला मागेपुढे पाहणार नाही', असा थेट इशाराही दिला. खमेनी यांचा इशारा अशा वेळी आला आहे, जेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी नेतन्याहू यांच्याशी गाझा ताब्यात घेण्याच्या आणि येथील लोकसंख्येला इतर देशात स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावावर चर्चा केली आहे. गाझामधून पॅलेस्टिनींना बळजबरीने शेजारच्या अरब देशांमध्ये स्थलांतरित करण्याच्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रस्तावाचा संदर्भ देत खमेनी म्हणाले, अमेरिका कागदावर जगाचा नकाशा काढीत आहे, पण हा केवळ कागदावरच आहे, त्याचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. तसेच, अमेरिकेशी वाटाघाटी करणे ही शहाणपणाची, विवेकाची किंवा आदराची बाब नाही, असेही खमेनी यांनी म्हटले आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा ट्रान्सजेंडर्स बाबतीत आणखी एक मोठा निर्णय

■ न्यूयॉर्क

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आणखी एका एक्झिक्युटिव्ह ऑर्डरवर सही केली आहे. या आदेशानुसार ट्रान्सजेंडर व्यक्तींना महिलांविरोधात क्रीडा स्पर्धेत भाग घेण्यास मनाई करण्यात आली आहे. या निर्णयामुळे खेळामध्ये निष्पक्षता येईल, असे रिपब्लिकन नेत्यांचे म्हणणे आहे. मात्र एलजीबीटीक्यू समर्थक आणि मानवाधिकार संघटनांनी हा निर्णय भेदभाव करणारा आहे असे म्हटले आहे. या आपल्या नव्या नीतीचा ऑलिम्पिक समितीही विचार करेल अशी अपेक्षा ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. याबरोबरच ट्रम्प यांनी आणखी एका आदेशावर सही केली आहे. यानुसार इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्टावरही त्यांनी निर्बंध घातले आहेत.

# यूपीएससी शिक्षक व आपचे उमेदवार अवध ओझा पराभूत

■ नवी दिल्ली

प्रसिद्ध युट्यूबर आणि यूपीएससी शिक्षक अवध ओझा यांना आपकडून यंदा सिसोदिया यांच्याऐवजी पटपडगंज विधानसभा मतदारसंघात उमेदवारी दिली होती. मात्र भाजपाच्या रवींद्र सिंह नेगी यांनी त्यांचा पराभव केला. गेल्या निवडणुकीत पटपडगंज मतदारसंघात रवींद्र सिंह नेगी यांनी मनीष सिसोदिया यांना कडवी टक्कर दिली होती. तेव्हा कमी मतांच्या फरकाने मनीष सिसोदिया निवडणूक जिंकू शकले होते. यावेळी रवींद्र सिंह नेगी यांना एकूण ७४ हजार ६० मते मिळाली, तर आपचे उमेदवार अवध ओझा यांना ४५ हजार ९८८ मते मिळाली. काँग्रेसचे अनिल चौधरी तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना १६ हजार ५४९ मते मिळाली आहेत. पराभवानंतर अवध ओझा म्हणाले की, मी जनतेचे आभार मानतो. मी दुसरा क्रमांकावर आलो. पुढच्या वेळी अव्वल येण्याचा प्रयत्न करीन.

# पॅराशूट वेळेत न उघडल्याने वायुदलाच्या जवानाचा मृत्यू

■ आग्रा

वायुदलाच्या सैनिकांच्या प्रशिक्षणादरम्यान देण्यात आलेले पॅराशूट वेळेवर न उघडल्याने वायुदलाच्या एका जवानाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आग्रा येथील वायुदलाच्या प्रशिक्षण केंद्रातून सकाळी साडेआठ वाजता १२ जवानांनी पॅराशूट प्रशिक्षणासाठी उड्डाण केले. विंग कमांडर रोहित दहिया यांच्या विमानातून या सर्वांनी एका ठराविक उंचीवरून बाहेर उड्या मारल्या. यावेळी वायुदलाचे वॉरंट ऑफिसर मंजुनाथ यांचे पॅराशूट जमिनीवर येताना उघडलेच नाही. त्यामुळे ते थेट जमिनीवर एका गव्हाच्या शेतात पडले व गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तातडीने वायुदलाच्या रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. वायुदलाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी सुरू केली.

# कांगोमध्ये बंडखोरांचे सैतानी कृत्य अत्याचार करून महिलांना जाळले

■ ब्रॅझविले

रवांडाचं समर्थन असलेल्या एम-२३ बंडखोरांनी कांगोच्या गोमा शहरावर कब्जा केला आहे. त्यांच्याकडून अनेक क्रूर कृत्ये केली जात आहेत. संयुक्त राष्ट्राने दिलेल्या माहितीनुसार, बंडखोरांनी मुंजेंजे तुरुंगात कैद असलेल्या शेकडो महिलांवर बलात्कार केला. त्यानंतर त्यांना जिवंत जाळण्यात आले. गेल्या आठवड्यात बंडखोरांनी डेमोक्रॅटिक ऑफ कांगोच्या गोमा शहरावर ताबा मिळवला. तेव्हापासून तिथल्या नागरिकांविरोधात हिंसाचार सुरू आहे. या हिंसाचारात हजारो लोक मारले गेले आहेत. त्यांचे मृतदेह अद्याप दफन करण्यात आलेले नाहीत. मुजेन्जे तुरुंगातील महिला कैद्यांवर हल्ला करण्यात आला. त्यावेळी हजारो पुरुष तुरुंगातून पळून जाण्यात यशस्वी ठरले.

# अमेरिकेत ब्रिटनचा राजपुत्रही असुरक्षित

■ वॉशिंग्टन



अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी देशात अवैधरित्या राहणाऱ्यांविरोधात मोहीम राबवली आहे. १०४ भारतीयांना हातकड्यांमध्ये परत पाठवले. या पध्दतीवर टीका होत आहे. मात्र केवळ भारतीयच नव्हे तर ब्रिटनचा अमेरिकेत राहात असलेला राजपुत्र प्रिन्स हॅरीही अमेरिकेत असुरक्षित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रिंस हॅरी अमेरिकेत राहात आहेत. त्यांची व्हीसा व इमिग्रेशनची कागदपत्रे उघड करण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये झालेल्या सुनावणी दरम्यान न्यायाधीश कार्ल निकोलस यांनी ते सर्वसामान्य व्यक्ती नसल्याने त्यांची कागदपत्रे उघड करता येणार नाहीत असे म्हटले होते. आता मात्र सरकार बदलल्यामुळे त्यांची कागदपत्रे उघड करता येतील असे त्यांनीच म्हटले आहे. त्यामुळे प्रिन्स हॅरी अमेरिकेत कोणत्या अधिकाराने व परवानगीने राहत आहेत हे स्पष्ट होणार आहे.

# मार्मिकचे ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांचे निधन


■ मुंबई



ज्येष्ठ पत्रकार, मार्मिकचे माजी कार्यकारी संपादक पंढरीनाथ सावंत यांचे आज पहाटे त्यांच्या राहत्या घरी झोपेतच निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर भोईवाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनी दुःख व्यक्त केले आहे. पंढरीनाथ सावंत हे प्रबोधनकार ठाकरे यांचे शिष्य, बाळासाहेब ठाकरेंचे विश्वासू निकटवर्तीय होते. महाडचे विन्हेरे हे त्यांचे मूळ गाव होते. सावंत यांनी दीर्घकाळ पत्रकारिता केली. त्यांनी विपुल लेखन केले. विविध विषयांवर त्यांनी लिहिलेले शोध-लेख लिहिले. त्यांनी प्रभंजन, ब्लिटझ, श्री, चित्रलेखा, जी या नियतकालिकांत काम केले. सावंत यांना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग. गो. जाधव पुरस्कार तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या जाण्याने एक साक्षेपी पत्रकार हरपल्याची प्रतिक्रिया अनेक मान्यवरांनी व्यक्त केली आहे.

# वाढवणजवळ उभी राहणार चौथी मुंबई एमएसआरडीसीचा प्रस्ताव सरकारकडे सादर

■ मुंबई



कर्नाळा-साई-चिरनेर न्यू टाऊन या तिसऱ्या मुंबईनंतर आता वाढवण बंदरानजीक चौथी मुंबई उभारण्यात येणार आहे. यासाठी १०७ गावांतील ५१२ चौरस किमी क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसी अर्थात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने राज्य सरकारकडे सादर केला आहे.

नीती आयोगाने मुंबई शहराला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. त्यासाठी मुंबई महानगर प्रदेशात आर्थिक विकास केंद्र म्हणजेच ग्रोथ हब उभारली जाणार आहेत. त्यातच आता देशातील सर्वात मोठे बंदर वाढवण येथे उभारले जात आहे. डहाणू तालुक्यात वाढवण आणि पालघर तालुक्यात केळवा येथे दोन विकास केंद्र उभारण्यासाठी राज्य सरकारने यापूर्वीच एमएसआरडीसीची नियुक्ती केली होती. त्यानुसार डहाणू तालुक्यातील ११ आणि पालघर तालुक्यातील ३ गावांमध्ये ही विकास केंद्रे साकारली जाणार होती. यातील वाढवण विकास केंद्र हे ३३.८८ चौ. किमी, तर केळवा केंद्र ४८.२२ चौ. किमी क्षेत्रावर उभारण्याचे प्रस्तावित होते. वाढवण बंदराच्या प्रभाव क्षेत्रातील तब्बल १०७ गावांमध्ये आणि ५१२ चौरस किमीच्या प्रदेशात चौथी मुंबई विकसित करण्यासाठी एमएसआरडीसीने प्रस्ताव तयार केला आहे. हा प्रस्ताव जानेवारीमध्येच एसआरआरडीसीने राज्य सरकारकडे पाठविला आहे. या प्रस्तावानुसार चौथ्या मुंबईची हद्द वाढवण बंदराच्या क्षेत्रापासून ते तलासरीपर्यंत विस्तारलेली असेल, अशी माहिती एमएसआरडीसीतील सूत्रांनी दिली.

# 'आपदा'पासून दिल्ली मुक्त झाली पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

■ नवी दिल्ली

**आजचा** विजय हा ऐतिहासिक विजय आहे. एक दशकाची 'आपदा' दिल्लीकरांनी घालवली. त्यांच्यापासून दिल्ली मुक्त केली. काँग्रेसवाल्यांना आपले खातेही उघडता आले नाही. त्यांनी आज शून्याची हॅट्ट्रिक केली. दिल्लीकरांनी आम्हाला प्रेम दिले आणि विश्वास दाखवला. हे कर्ज आमचे डबल इंजिन सरकार चुकवणार, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. दिल्ली विधानसभेच्या निकालानंतर संध्याकाळी दिल्लीतील भाजप मुख्यालयात विजयोत्सव साजरा करताना ते बोलत होते.

मोदी पुढे म्हणाले की, दिल्लीकरांनी स्पष्ट केले आहे की, दिल्लीची मालकी ही फक्त आणि फक्त दिल्लीकरांकडे आहे. ज्या लोकांना दिल्लीचे मालक असण्याचा अहंकार होता, त्यांना वास्तवाची जाणीव दिल्लीकरांनी करून दिली. दिल्लीच्या जनादेशाने हे स्पष्ट केले की, राजकारणात शॉर्टकटसाठी, भ्रष्टाचारासाठी, खोट्या गोष्टींसाठी काहीही जागा नाही. जनतेने शॉर्टकटच्या राजकारणाचे शॉर्टसर्किट केले. भ्रष्टाचाराविरोधातील आंदोलनातून तयार झालेला पक्षच भ्रष्टाचारात अडकला. आपदाचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री जेलमध्ये गेले.

# जयंत पाटील भाजपात जाण्याची पुन्हा चर्चा

**मुंबई-** शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची इस्लामपूर येथे भेट घेणार आहेत. १६ फेब्रुवारी रोजी जयंत पाटील यांचा वाढदिवस आहे. नितिन गडकरी हे १७ फेब्रुवारीला इस्लामपूर दौऱ्यावर येणार आहेत तेव्हा जयंत पाटील त्यांची भेट घेणार आहेत. यामुळे ते लवकरच भाजपात प्रवेश करतील अशी चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. जयंत पाटील हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीऐवजी भाजपात जातील का? असाही प्रश्न विचारला जात आहे.

मध्य रेल्वे
विविध सिग्नलिंग कामे
विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसॲण्डटी), १ला मजला, पार्सल कार्यालय इमारत, प्लॅटफॉर्म क्र. १४ आणि १५च्या वर, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई - ४००००१ भारताच्या राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खुल्या निविदा आमंत्रित करीत आहेत. १) निविदा सूचना क्र. सीआर/बीबी/एसॲण्डटी/उत्तर/२०२५/०१. कामाचे नाव: मुंबई विभागाच्या उत्तर अनुभागामध्ये कर्जत स्टेशन येथे प्लॅटफॉर्मच्या विस्ताराकरिता सिग्नलिंग गिअरचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन आणि इगतपुरी येथे पादचारी पुलाच्या विस्तारासंबंधात सिग्नलिंग काम. अंदाजित किंमत: ₹ ४.३६ कोटी. उघडण्याचा दिनांक: ०७.०३.२०२५ ईएमडी: ₹ ३६८३००/-, वैधता: ६० दिवस, पूर्तता कालावधी: १८ महिने. २) निविदा सूचना क्र. सीआर/बीबी/एसॲण्डटी/दक्षिण/२०२५/०५ .कामाचे नाव: मुंबई विभागाच्या दक्षिण अनुभागामध्ये पीडब्ल्यूपी २०२३-२४ करिता पीएच-३१ अंतर्गत सीटीआर/टीटीआर कामांच्या संबंधात सिग्नलिंग कामे आणि डाऊन टीएच लाईनवर केएलव्हीए-एमबीक्यू अनुभागादरम्यान किमी ३९/३२० येथे न्यूट्रल सेक्शनचे शिफ्टींग. अंदाजित किंमत: ₹ १.८४ कोटी. उघडण्याचा दिनांक: ०७.०३.२०२५ ईएमडी: ₹ २४२४००/-, वैधता: ६० दिवस, पूर्तता कालावधी: १२ महिने. सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण (मेक इन इंडिया) आदेश २०१७, दिनांक १५.०६.२०१७ चे अनुपालन करते. निविदांचे संपूर्ण तपशील मध्य रेल्वेच्या अधिकृत वेबसाईट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. संपूर्ण निविदा दस्तऐवज वेबसाईटवरून डाऊनलोड करता येतील. निविदेचे संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसॲण्डटी)चे कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ४००००१ येथील "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहे. 762
रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

# हॉलतिकीटवर वेगळेच विषय! १२वीच्या विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ

■ कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी बारावीची परीक्षा २ दिवसांवर आली असताना कोल्हापुरातील विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या हॉलतिकीटवर वेगळेच विषय आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ उडाला आणि काही विद्यार्थ्यांना आपले नुकसान होणार म्हणून रडू कोसळले. ११ फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू होणार आहे. आज विमला गोयंका इंग्लिश मीडियम शाळेमध्ये परीक्षेचे हॉलतिकीट वाटप करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांचे विषय बदलून आल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले.तर काही विद्यार्थ्यांना हॉलतिकीटच मिळाले नाही. ज्या विद्यार्थ्यांना हॉलतिकीट मिळाले, त्यावर कॉम्प्युटर सायन्सच्या ठिकाणी मराठी, भूगोल, जीवशास्त्र या विषयांच्या जागी गणित आणि मराठी असे विषय आले आहेत. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांनी या शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली.

# धारावी प्रकल्पाच्या श्रीनिवास यांची बेस्ट महाव्यवस्थापकपदी निवड वादात

पान १ वरून- धारावी आणि काळा किल्ला या दोन्ही डेपोंची मिळून जागा १२ एकर इतकी आहे. धारावी पुनर्विकासासाठी अदानी समूहाला या दोन्ही डेपोंची जागा हवी आहे. अदानीने धारावी प्रकल्पासाठी मुंबईतील ज्या वीस जागांची मागणी केली होती, त्यात धारावी डेपोच्या जागेचाही समावेश होता. अदानी समूहाने या जागेच्या बदल्यात बेस्टला पार्किंगसाठी जास्त जागा, बेस्ट कर्मचाऱ्यांसाठी अधिक सुविधा देण्याचे आमिष दाखवले आहे. बेस्टचे यापूर्वीचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांनी यासाठी बोलणी सुरू केली होती. त्यानंतर त्यांची बदली झाली. आता या पदावर थेट धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास यांचीच निवड करण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# ओमप्रकाश निंबाळकर यांचे काका बाबा पाटलांच्या गाडीचा अपघात

■ धाराशिव

ठाकरे गटाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचे काका बाबा पाटील यांच्या गाडीचा अपघात झाला. लातूर - उमरगा मार्गावरील नारंगवाडी तलावाजवळ बाबा पाटील यांची कार पिकअपला धडकली. गाडीच्या एअर बॅग उघडल्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. पिकअपचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पिकअपचे एक चाक निखळले. या अपघातात पिकअपमधील ५ जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# आपचा दारुण पराभव ! प्रमुख नेतेही पराजित

पान १ वरून

आहेत. तर आपला केवळ २२ जागा मिळाल्या आहेत. गेल्या निवडणुकीच्या (२०२०) तुलनेत भाजपाला ९ टक्के जास्त मते मिळाली आहेत. तर 'आप'च्या मतांत १० टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली आहे. काँग्रेसला एकही जागा मिळणार नसली तरी त्यांच्या मतांचा वाटा २ टक्के वाढला आहे.

आज सकाळी मतमोजणी सुरू झाली तेव्हा सुरुवातीपासून कल भाजपाच्या बाजूने असल्याचे स्पष्ट होत गेले. नंतर एकेक धक्कादायक निकाल जाहीर होत गेले. यातील सर्वात धक्कादायक निकाल नवी दिल्ली मतदारसंघात लागला. इथे आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल हेच पराभूत झाले. भाजपाचे प्रवेश शर्मा आणि काँग्रेसचे संदीप दीक्षित यांच्याशी त्यांची लढत होती. ही लढत चुरशीची होईल, असा अंदाज होता. मात्र अरविंद केजरीवाल या मतदारसंघात सुरुवातीपासून पिछाडीवर होते. मतमोजणीच्या मध्यावर त्यांनी किंचित आघाडी घेतली होती. मात्र ती आघाडी फार काळ टिकली नाही. प्रवेश शर्मा यांनी केजरीवाल यांचा ४,००८९ मतांनी पराभव केला. तर माजी उपमुख्यमंत्री सिसोदिया जंगपुरा मतदारसंघातून ९०० मतांनी निवडणूक हरले. सत्येंद जैन शकूर बस्ती, तर सौरभ भारद्वाज ग्रेटर कैलाश मतदारसंघातून पराभूत झाले. या पडझडीत माजी मुख्यमंत्री आतिशी यांनी मात्र कालकाजी मतदारसंघात ३,५२१ मतांनी विजय मिळवून पक्षाची लाज काही प्रमाणात राखली. केजरीवाल यांनी प्रतिक्रिया देताना निकाल स्वीकारला आणि जनतेसाठी लढत राहू असे म्हटले.

मतमोजणीला निर्णायक आघाडी मिळताच भारतीय जनता पक्षाच्या समर्थकांनी राजधानीतील मुख्यालयात जल्लोष करण्यास सुरुवात केली. ढोल-ताशांच्या तालावर समर्थकांनी नाचत पक्षाचे झेंडे फडकावले. भाजपाचे चिन्ह असलेल्या कमळाचे कटआऊट हातात घेऊन समर्थकांनी एकमेकांना भगव्या रंगाने रंगवले. भाजपाच्या कार्यकर्त्यांचा असा जल्लोश सुरू झाला. सायंकाळी मोदींनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. भाजपा कुणाला मुख्यमंत्री पद देईल याच्या नावांची चर्चा सुरू झाली. आपच्या कार्यालयात तेव्हा शांतता होती. कुणालाच आत प्रवेश दिला जात नव्हता. काँग्रेस कार्यालयातही शुकशुकाट होता.

केवळ ७० मतदारसंघ असलेली दिल्ली विधानसभेची निवडणूक यावेळी आप, भाजपा आणि काँग्रेस या सगळ्याच पक्षांनी प्रतिष्ठेची केली होती. २०१४ पासून देशात भाजपाची सत्ता आहे. या दहा वर्षांत भाजपाने अनेक राज्यांत सत्ता मिळवली. मात्र देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत भाजपाला गेल्या १० वर्षांत सत्ता मिळवणे जमले नव्हते. अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने भाजपाच्या नाकावर टिच्चून मागील दोन निवडणुकीत विजय मिळवला होता. या निवडणुकांत भाजपाला अनुक्रमे फक्त ३ आणि ८ जागा जिंकता आल्या होत्या. दिल्लीच्या विकासाचे मॉडेल वापरून आपने भाजपावर नेहमीच मात केली. त्यामुळे यावेळी कोणत्याही परिस्थितीत आपला जिंकू द्यायचे नाही, असा चंग भाजपाने बांधला होता. यासाठी साम-दाम-दंड-भेद नीतीचा अवलंब करून आपला नामोहरम करण्यात आले. उपराज्यपालांच्या माध्यमातून आप सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आपच्या प्रमुख नेत्यांना विविध भ्रष्टाचार प्रकरणात तुरुंगात पाठवण्यात आले. मद्य घोटाळ्यात अरविंद केजरीवाल यांनाही तुरुंगात डांबण्यात आले. त्यांना आपले मुख्यमंत्रिपदही गमवावे लागले. भ्रष्ट नेते अशी आप नेत्यांची प्रतिमा तयार करण्यात भाजपा यशस्वी ठरली. पंतप्रधान मोदी यांनीही यावेळी 'आप' दिल्लीकरांना नको, असा सातत्याने प्रचार केला. भाजपाच्या मीडिया सेलने आपविरुद्ध खऱ्या-खोट्या बातम्या प्रसारित करत आपविरुद्ध शक्य तितका नकारात्मक प्रचार केला.

या निवडणुकीत आप, काँग्रेस आणि भाजपा या तिन्ही पक्षांत मोफत योजना जाहीर करण्याची स्पर्धाच लागली होती. आपने महिला, विद्यार्थी, वृद्ध, रिक्षावाले यांच्यासाठी अनेक मोफत योजना जाहीर केल्यावर आपपाठोपाठ काँग्रेस आणि भाजपाने याच प्रकारच्या योजना आणल्या. एकमेकांवर रेवडी वाटपाचा आरोप करणाऱ्या या तिन्ही पक्षांनी मतदारांवर आश्वासनांची लयलूट केली. मात्र, मतदारांनी भाजपाला पसंती देऊन आप व काँग्रेसला नाकारले. दिल्लीतील पराभवामुळे आम आदमी पक्षाचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा कायम राहणार का याबाबत शंका निर्माण झाली आहे. दिल्लीत पराभव झाल्याने आता पंजाबमध्ये 'आप' सरकार डळमळीत होण्याची शक्यता आहे. या पराभवामुळे इतर राज्यांमध्ये 'आप'चा विस्तार करण्याच्या केजरीवालांच्या मोहिमेला खीळ बसली आहे. दिल्लीत जनमत 'आपदा'च्या विरोधात गेल्याने अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर जनतेने मोहर उमटवली, असा प्रचार आता भाजपा आणखी जोमाने करील. तर आता मद्यधोरण घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, संजय सिंह यांची आणखी कायदेशीर कोंडी होण्याची शक्यता आहे.

## दिल्लीत मुख्यमंत्री आतिशींनी गड राखला!



अरविंद केजरीवाल कोठडीत गेल्यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्री झालेल्या आतिशी मार्लेना या कालकाजी विधानसभा मतदारसंघातून विजयी झाल्या. या मतदारसंघातून आतिशी यांनी भाजपाचे रमेश बिधुरी आणि काँग्रेसच्या अलका लांबा यांचा पराभव केला. मतमोजणीदरम्यान अनेक फेऱ्यांमध्ये आतिशी भाजपाच्या रमेश बिधुरीपेक्षा पिछाडीवर होत्या. मात्र हळूहळू बिधुरी यांच्या मतांमधील अंतर कमी केले आणि शेवटी ३ हजार ५२१ मतांनी आतिशी विजयी झाल्या. आतिशी यांना ५२ हजार १५४ मते मिळाली तर भाजपाच्या रमेश बिधुरी यांना ४८ हजार ६३३ मते मिळाली. काँग्रेसच्या अलका लांबा यांना मात्र फक्त ४ हजार ३९२ मते मिळाली आहेत. विजयानंतर आतिशी म्हणाल्या की, कालकाजीच्या लोकांनी माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. मी माझ्या टीमचे अभिनंदन करते ज्यांनी ताकद, गुंडगिरी आणि हिंसाचाराचा सामना केली.


पश्चिम रेल्वे
ॲडव्हान्स्ड केमिस्ट्री सेल (एसीसी) बॅटरी स्टोरेज प्रणाली
वरि. विविअभि/पी/बीसीटी आमंत्रित करीत आहेत निविदा सूचना क्र.: ईएल-८१-६९६-डब्ल्यूए-५६ (आर) दि. ०६.०२.२०२५. काम आणि ठिकाण: मुंबई विभाग, भाईंदर, वसई रोड, घोलवड, वलसाड आणि दोंडाईचा येथे ॲडव्हान्स्ड केमिस्ट्री सेल (एसीसी) बॅटरी स्टोरेज प्रणालीची तरतूद. कामाचे अंदाजित मूल्य: ₹ १,७७,००,०००/-. बोली सुरक्षा ईएमडीची किंमत: ₹ २,३८,५००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. ०५.०३.२०२५ रोजी, १५.०० वाजेपर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. ०५.०३.२०२५ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 1052
facebook.com/WesternRly

मध्य रेल्वे
ई-लिलावाची सूचना
मुंबई विभाग, मध्य रेल्वे खाली दिलेल्या संपत्ती भाडेतत्त्वावर देण्याकरिता ई-लिलाव लिजिंग मॉड्युल द्वारे www.ireps.gov.in वर ई-लिलाव आमंत्रित करीत आहे. **इच्छुक बोलीदारांनी ई-लिलाव लिजिंग मॉड्यूलवर नोंदणी करणे आणि ई-लिलावापूर्वी सर्व आवश्यक दस्तऐवज अपलोड करणे आवश्यक आहे**. अधिक तपशिलाकरिता इच्छुक बोलीदारांनी खालील उल्लेखित ई-लिलावाचे तपशील जाणून घेण्याकरिता वेबसाईट www.ireps.gov.in ला भेट द्यावी.

| अ.क्र. | श्रेणी | उप-श्रेणी | लिलाव सुरुवात दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जाहिरात | स्टेशनवर जाहिराती (आरडीएन-नॉन डिजिटल/आरडीएन-डिजिटल) दोन्ही | ११.०२.२०२५, १४.०२.२०२५ |
| | | मोबाईल असेट्स अंतर्गत आणि बाह्य मीडिया | ०७/०२/२०२५, १३/०२/२०२५, १४/०२/२०२५ |
| | | ओओएच | १२.०२.२०२५ |
| २ | इतर एनएफआर | एटीएम्स | ०६.०२.२०२५ |
| | | कल्याण/इगतपुरी येथे आरामदायक मसाज खुर्ची | १५.०२.२०२५ |
| | | प्रचारात्मक किओस्क २ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस/१ ठाणे | १८.०२.२०२५ |
| | | पार्सल स्कॅनर | ०७.०२.२०२५ |
| ३ | पे आणि पार्किंग | संमिश्र | १३.०२.२०२५ |
| ४ | पार्सल | ०३एसएलआर, ०७आरएसएलआर, ०८आरएसएलआरएलएचबी, २४पीएसएलआर | १०/०२/२०२५, १२/०२/२०२५, १३/०२/२०२५, २०/०२/२०२५ |
| ५ | कॅटरिंग | कॅटरिंग-९ | ०७.०२.२०२५ |

सदर लिलावाच्या संबंधात पुढील जोडपत्र/शुद्धीपत्रक, लॉट/कॅटलॉग मागे घेणे, दिनांकामध्ये बदल, वेळ विस्तार, स्पष्टीकरण इ. जर असल्यास, फक्त वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल. बोलीदारांनी त्यांना अद्ययावत ठेवण्याकरिता वेबसाईटला नियमित भेट देत रहावी. 757
रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

# नवाकाळ शब्दकोडे-११५९



**आडवे शब्द –**

१. मुरली ३. उदरनिर्वाह ५. सर्व सद्गुण अंगी असलेला ९. कुबेराचा सेवक, यक्ष १०. गाढव, मूर्ख ११. भांडण, खटला १२. कपाळ १३. पार्वती १५. जिव्हार, नाजूक जागा १६. विष्णूचा एक अवतार १८. घातक सवय २०. गुंफा, घळ २१. तोटा २४. घोड्याला नियंत्रित करण्यासाठी चामड्याची वादी २५. झुकलेला, तिरपा २६. फासळी २७. झेप २९. प्रामाणिकपणा ३१. काकडी ३२. लबाड, पाजी ३३. तीन पायांची घडवंची ३५. ध्वनी ३७. संतप्त, क्रुद्ध ३८. हेकेखोर ३९. चंगळ, अधिक पैदास ४०. चाखून खाण्याचे औषध ४२. सैल ४३. मुलाचा/मुलीचा मुलगा ४४. जनरेटर ४५. जनावर ४६. विजयी वीर ४७. कार्यालय ४९. सरपटणारा किळसवाणा प्राणी ५२. लाटा ५४. चिन्ह ५६. विरोध, प्रतिबंध ५७. संपत्ती ५९. मुक्काम ६०. दिशाहीन धावत सुटणे ६१. भसाडा आवाज ६३. एखाद्या विषयावर जनतेची एकूण भावना ६४. समूह ६५. खोटा आरोप ६६. शुक्राचार्यांनी शोधलेली विद्या ६७. नैसर्गिक ६९. न बोलता राग व्यक्त करणे ७१. वाहन ७२. भिजलेला ७४. दळलेली हळद ७६. झुंड ७८. पोळीचा कुरकुरीत प्रकार ८०. रक्तिमा ८२. जादूटोण्याचा जुना कथित प्रकार ८५. मोठा नगारा ८६. आरंभीचा ८७. चारचाकी वाहनप्रकार ८९. गावातील तलाठी ९०. रचणारा ९२. देव ९३. नखाच्या तळाशी आलेली सूज ९६. वल्लरी ९८. सहावी तिथी ९९. पत्रिकेत केतूच्या विरूद्ध दिशेला असणारा ग्रह १०१. कैवार, कड १०२. स्वच्छंद प्रवास १०३. वागणूक १०४. बेरकी

**उभे शब्द –**

१. बाहेरचा, परका २. सर्व, तमाम ३. लढवय्या ४. भाग, विभाग ५. गॅलरी, व्हरांडा ६. भूषण ७. शक्यता ८. पलाश वृक्ष ९. छोटा हुक्का १०. पुढे गेलेल्यांच्या मागून (पूर्ण विचार न करता) डोळे मिटून जाणारा, अज्ञानाने परंपरागत चालणारा किंवा वागणारा ११. पगारी नोकर १४. वेडा १६. सुतारकामाचे एक अवजार १७. अपऱ्या नाकाची १९. विभ्रम, खोटा हावभाव २२. लाकडी फळ्यांचे छत २३. आभाळ २६. अननुभवी, पोरगेला २८. युवराज ३०. लाड, कौतुक ३१. दखल देखील न घेतलेला, दुर्लक्षित ३२. प्रेमात पडलेला, अनुरक्त ३४. राग, क्रोध ३६. वृद्धी, संवर्धन ३७. किरकोळ, नगण्य ३८. प्रयोजन ३९. नम्र ४१. उपस्थिती ४३. सोंगटी ४५अ. वेदना ४८. तोंडवळा ४९. बसण्याची लाकडी फळी ५०. चमक ५१. गुन्हेगारी कृत्य ५३. सांप्रत ५५. शिखर, माथा ५६. निर्नायिकी ५७. साहचर्य ५८. बारकाईने तपासणी ६१. गर्दी ६२. दोहनाचे भांडे, चरवी ६३. निकटचे नाते ६५. अजून, अधिक ६८. जवळचा, जिवलग ७०. राजपुत्राची आजी ७१. नगर, पुर ७३. नाटकाचा सराव ७५. भास ७७. आईचा भाऊ ७८. खाण्याजोगे पदार्थ ७९. स्वतःच्या मर्जीने ८१. विपर्यास, गैर अर्थ ८३. महिला, स्त्री ८४. बाण, शर ८५. प्रिय स्त्री ८६. दागिना, अलंकार ८८. पक्ष्याचे पीस ९१. अनुकूल काळ, बरकत ९४. रांजण, मोठा माठ ९५. बावळट ९७. अधम १००. खोडकर, खट्याळ •

**नवाकाळ कोडे क्रमांक ११५८ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. विसावा ४. गौप्य ६. आढेवेढे घेणे ९. मनीषा १०. टपरी १२. गडगंज १५. दडपण १७. कात १८. जीवन १९. खडाजंगी २२. जीव की प्राण २४. कडे २५. बूच २६. बदसुरत २९. चालक ३१. सुशील ३२. पुगीफल ३४. रस्सी ३६. नकील ३८. वखर ३९. भला ४०. जिणे ४१. खव ४२. दबाव ४३. गदा ४४. भरवसा ४६. तेव्हा ४८. तलाव ४९. यती ५०. मोरावळा ५१. रजक ५४. खोक ५५. देवमासा ५७. पुण्यवान ५८. रंध्र ५९. लुंगी ६०. कृश ३२. पुर ६३. अंगारक ६४. अवहेलना ६७. वन्ही ६९. राजी ७०. सुंभ ७१. सुतळी ७३. साजणी ७५. द्वाड ७६. अंगारकी ७७. इंगित ७८. गरज ७९. तरंत ८१. तारीख ८३. परवड ८५. गारवा ८७. गोठ ८८. राब ९०. यक्ष ९१. दही ९२. नव ९३. यात्रा ९५. रदबदली ९८. पापी ९९. थरार १००. शालीन १०१. सच्चा १०२. कलागत १०३. निवारा

**उभे शब्द** : १. सुमन २. विषाद ३. वाटप ४. गौरी ५. रोड ६. आजवर ७. वेस ८. घेवडा ११. पणजी १२. गतप्राण १३. गंजी १४. उगीच १६. डवरणे १७. काकी १९. खडे चारणे २०. जंबूक २१. अंदर की बात २३. वक्तशीर २७. सुगी २८. फूल ३०. लस्सी ३१. सुखदायक ३२. पुलाव ३३. फट ३५. अवलोकन ३६. नद ३७. लवलाही ३८. वग ३९. भरधाव ४०. जिव्हाळा ४५. सामोसा ४६. तेवढे ४७. हिरण्य ५२. जवान ५३. परंपरागत ५४. खोगीर भरती ५५. देश ५६. मार्दव ५७. पुरवणी ५९. लुंगासुंगा ६१. सैल ६४. अळी ६५. हेरगिरी ६६. नासा ६८. जहजवाहीर ७२. तयारी ७४. जहर ७५. द्वार ७६. अंतर ७८. गड ८०. रंगावली ८१. ताठर ८२. खराब ८३. पक्षपात ८४. वय ८६. वाया ८९. बदक ९१. दरारा ९२. नशा ९४. त्रास ९६. दर्या ९७. लीला ९९. थवा




**रविवार ९ फेब्रुवारी २०२५ ते शनिवार १५ फेब्रुवारी २०२५**

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.**

## मेष

**आठवड्याची** सुरुवात चांगली होणार आहे. तुम्हाला नवीन संधी मिळू शकतात. धडाडीने व उत्साहात काम कराल. प्रवासाचे योग आहेत. काही अडथळे आले तरी जिद्दीने, संयमाने कामे पूर्ण करा. तुमच्या कर्तृत्वाला वाव मिळेल. केलेल्या कामाचे चीज होईल. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. मात्र खर्चावर नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबासाठी अचानक खर्च करावा लागेल. आर्थिक गुंतवणूक अतिशय काळजीपूर्वक करा. कुटुंबातील सदस्याची, जोडीदाराची उगीचच चिंता वाटत राहील. एकमेकांमध्ये गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्या. बोलण्यामुळे नुकसान होऊ शकते. संतती व भावंडांचे सौख्य राहील.

व्यावसायिकांना आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. भागीदारीत व्यवसाय असल्यास जास्त काळजी घेणे योग्य ठरेल. कलाकौशल्याची आवड किंवा या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी विशेष चांगला काळ आहे. नोकरदारांनी आपली ठरलेली कामे जिद्दीने नीट पार पाडावी. संघर्ष टाळणे योग्य ठरेल.

रक्तदाब, मधुमेह याकडे दुर्लक्ष नको. डोळ्यांची काळजी घ्या. श्वसनविकार तसेच संधिवात त्रासदायक ठरू शकतो.

**शुभ दिनांक :** ०९, ११, १३.

## वृषभ

**कष्ट** व प्रयत्न यात कमी पडू नका. तुम्हाला भाग्याची साथ मिळणार आहे. मिळणाऱ्या नवीन संधी दवडू नका. त्यातून लाभ होणार आहे. फक्त मनात येणाऱ्या शंकांचे निरसन करून मग पावले उचला. ज्येष्ठांच्या सल्ल्याचा उपयोग होणार आहे. कुठलेही काम घाई गडबडीत करू नका. नियोजन आवश्यक आहे. आर्थिक स्थिती साधारण राहील. खर्च आटोक्यात ठेवा. कार्यात अडथळे आले तरीही मनात भय किंवा किंतु न ठेवता योग्य नियोजन करून कामे पूर्ण करा. गुरुचे पाठबळ आहे. कुटुंबातील, घरातील वातावरण शिस्तीचे राहील. आनंदी वातावरण ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. जोडीदाराबरोबर सामोपचाराचे धोरण उपयोगी पडेल. संततीचे यश, कर्तृत्व तुम्हाला समाधान देईल.

व्यावसायिकांना आर्थिक फायदा तसेच मान मिळेल. स्वतःच्या क्षेत्रामधील अनुभवी व्यक्तीची मदत उपयोगी पडेल. नोकरदारांनी हितशत्रूंपासून सावध राहावे. अधिकारात वाढ होईल.

शीतविकार, वातविकार, पाय दुखणे या त्रासांमध्ये वाढ होईल. पोषक धातूंची कमतरता जाणवेल. पोटाच्या तक्रारी दुर्लक्षित करू नका.

**शुभ दिनांक :** १०, ११, १२.

## मिथुन

**आठवड्याच्या** सुरुवातीलाच तुमच्या कष्टाचे, कामाचे चीज होताना दिसेल. अचानक आर्थिक लाभ होणार आहे. मनाप्रमाणे गोष्टी घडवून आणण्यासाठी तुम्ही आग्रही राहाल. मनातील संभ्रम दूर करून आपले ध्येय निश्चित करा. त्याप्रमाणे नियोजन करून व पुढाकार घेऊन कामे करा. आठवड्याच्या मधील काळात थोडे अडथळे आले तरीही संयम व जिद्द कायम ठेवा. लगेचच परिस्थिती आटोक्यात येईल.

घरापासून थोडे लांब जावे लागले तरीही ते फायदेशीर राहणार आहे. जोडीदाराची मदत मिळणार नाही. सामोपचाराने कौटुंबिक आघाडी सांभाळावी लागेल. घरगुती वस्तूवर खर्च कराल. संततीची थोडी काळजी वाटली तरी त्यातून मार्ग निघेल. प्रेमीजनांनी एकमेकांमध्ये गैरसमज होणार नाही याची काळजी घ्यावी.

व्यावसायिकांनी नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. फार मोठे धाडसी निर्णय घेऊ नका. नोकरदारांनी पुढाकार घेऊन कामे पार पाडावी. त्याचा फायदा होईल. वरिष्ठांची मदत होणार नाही.

आरोग्याच्या तक्रारी काही प्रमाणात कमी होतील. तरीही डोळे व श्वसनविकार याकडे लक्ष द्यावे. मानसिक आरोग्याकडेही लक्ष द्या.

**शुभ दिनांक :** ९, १०, १३, १५.

## कर्क

**या** आठवड्यात तुम्हाला परिस्थितीमध्ये चढउतार होताना आढळतील. तुमच्याकडूनच काही कळत-नकळत चुका होणार नाही याची काळजी घ्या. नियमबाह्य वर्तन घडू शकते. विचारपूर्वक धाडसी निर्णय घ्या. आठवड्याच्या मध्यावर परिस्थिती सुधारून काही शुभ संकेत मिळतील. आर्थिक स्थिती साधारण राहील. अचानक धनलाभ होऊ शकतो. मात्र खर्चावर नियंत्रण ठेवा. आत्म विश्वास कमी होऊ देऊ नका. कष्टामध्ये वाढ होईल.

कुटुंबाबरोबर धार्मिक यात्रेचे योग आहेत. सामाजिक कार्यातही सहभाग घ्याल. आई व जोडीदाराशी बोलताना काळजी घ्या. गैरसमज टाळावे. संततीसाठी जास्तीचा खर्च करावा लागेल.

व्यावसायिकांनी नवीन संधीचा फायदा घ्यावा व त्यासाठी अनुभवी, तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला उपयोगी पडेल. नोकरदारांनी सत्याचा मार्ग सोडू नये. हितशत्रूंवर मात कराल.

आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. पित्तविकार, रक्तदाब याची काळजी घ्यावी. मानसिक ताण कमी करा. हाडांची दुखणी, संधिवात त्रास देऊ शकतो.

**शुभ दिनांक :** ११, १२.

## सिंह

**आठवड्याची** सुरुवात चांगली होणार आहे. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. मित्रपरिवाराबरोबर चांगला वेळ घालवता येईल. खर्चावर नियंत्रण ठेवा. हितशत्रू, स्पर्धक डोक वर काढणार आहेत हे लक्षात ठेवून तुमच्या कामाचे नियोजन करून ठेवा. अतिआत्मविश्वास त्रासदायक ठरतो. तुमच्यातील ऊर्जा योग्य प्रकारे वापरा. नियमांच्या चौकटीत राहून काम करा.

घरगुती गोष्टींवर खर्च कराल. प्रवासाचे योग आहेत. घरापासून थोडे लांब जावे लागले तरीही जबाबदारी टाळता येणार नाही. जोडीदार व तुमच्यामध्ये अहंकार येऊ देऊ नका. तुमचे नियोजन व जोडीदाराचा अनुभवी सल्ला असे एकत्रित काम केल्यास फायदेशीर ठरेल. संततीची थोडी चिंता राहील.

व्यवसाय धंद्यात थोडे अडथळे आले तरी कामे पूर्ण होतील. अति धाडसी निर्णय घेणे टाळा. नोकरदारांना अडथळ्यांचा सामना करावा लागेल. प्रामाणिक प्रयत्नांमुळे तुमच्या सन्मानात वाढ होईल.

रक्तदाब, कफ विकार, हाडांची दुखणी त्रासदायक ठरतील. संसर्गजन्य आजारासंबंधित विशेष काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** ९, १०, १३, १४

## कन्या

**तुम्ही** केलेल्या कष्टाचे, कामाचे चीज होईल. लाभाचे प्रमाण वाढेल. सुरुवातीला आलेला आळस झटकून कामाला लागा. प्रत्येक गोष्टीचे योग्य प्रकारे नियोजन करून यश मिळवाल. हितशत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवा म्हणजे मानसिक त्रास होणार नाही. स्वतःकडूनच काही चुका झाल्यामुळे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अतिउत्साह टाळा. आर्थिक स्थिती चांगली राहील. अचानक धनलाभ होऊ शकतो. आर्थिक गुंतवणूक करताना विशेष काळजी घ्या.

व्यावसायिकांना नवीन संधी मिळू शकते. भागीदारीत व्यवसाय असल्यास खात्री, चौकशी करूनच पाऊल उचला. नोकरदारांनी अहंकार बाजूला ठेवावा व नियोजनपूर्ण व पुढाकार घेऊन कामे करावीत.

वैवाहिक जोडीदारामुळे भाग्यकारक घटना घडेल. एकमेकांशी सामंजस्य राखा. संततीसाठी वेळ काढा. मित्रमैत्रिणींबरोबर आनंदात वेळ घालवाल.

अचानक अशक्तपणा येणे, पोषक द्रव्य कमी होणे, संधिवात यासारखे त्रास होऊ शकतात. स्त्रियांनी हार्मोन्सशी संबंधित विकारांची काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** ९, १०, ११, १२.

## तूळ

**मनामध्ये** कुठल्याही शंका न ठेवता तुमच्या ध्येयाकडे वाटचाल करा. जशास तसे वागणे उचित ठरेल. मनासारख्या गोष्टी घडवून आणण्यासाठी भाग्याची साथ मिळेल. कष्ट करण्यात मागे पडू नका. कुठल्याही गोष्टीचे पूर्ण ज्ञान, माहिती घेऊन मगच पाऊल उचलावे. विचार करण्याबरोबरच कृतीलाही महत्त्व द्या. आर्थिक स्थिती साधारण चांगली राहील.

घरातील वातावरण चांगले राहील. संततीसाठी काही शुभ घटना घडतील. जोडीदाराशी मतभेद झाले तरी टोकाला जाऊ देऊ नका.

व्यावसायिकांसाठी चांगला काळ आहे. भावना आणि व्यवहार याचा समतोल राखा. आर्थिक गुंतवणूक करताना काळजी घ्या. स्पर्धकांवर लक्ष ठेवा. नोकरदारांनी आपला दिनक्रम काटेकोरपणे पाळावा. फसवणुकीपासून सावध राहा. अडथळे आले तरी त्यातून मार्ग निघेल. वरिष्ठांची साथ मिळेल.

घशाचे विकार, श्वसनाचे विकार, वातविकार याकडे लक्ष द्यावे. पथ्यपाणी सांभाळावे लागेल. आजाराचे निदान चुकू शकते. त्याची खबरदारी घ्यावी.

**शुभ दिनांक :** ११, १२, १३, १४.

## वृश्चिक

**तुम्ही** या आठवड्यात अडथळे पार करण्याची तयारी ठेवा. वृश्चिक रास आव्हान स्वीकारत असते. ते पार पाडण्यासाठी गुरुबळ आहे. अति उत्साह किंवा नैराश्य दोन्हीही टाळा. आठवड्याच्या पूर्वार्धात घेतलेले कष्ट उत्तरार्धात फळाला येतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. उगीचच अहंकाराला थारा देऊ नका. व्यावहारिक यशासाठी कष्टाला पर्याय नाही.

घरातील वातावरण आनंदी राखण्यासाठी तुम्हाला प्रयत्न करावे लागतील. घरातील ज्येष्ठांचा सल्ला, अनुभव उपयोगी पडेल. प्रेमीजनांसाठी विवाहाचे योग आहेत. संततीची थोडी चिंता राहील.जोडीदारामुळे फायदा होईल.

व्यवसायात अडचणी आल्या तरी तुम्ही त्या यशस्वीरित्या दूर कराल. भागीदार व तुमच्यामध्ये गैरसमज होणार नाही यासाठी सावधानता बाळगा. नोकरदारांनी संघर्ष टाळावा.

शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. फुफ्फुसाचे विकार, संधिवात याकडे लक्ष द्यावे. आजार वाढू नयेत यासाठी वेळीच औषधोपचार करा.

**शुभ दिनांक :** १२, १३, १४.

## धनु

**राशीस्वामी** गुरू मार्गी झाल्यामुळे तुमची स्थिती सुधारणार आहे. अडचणी येणार असल्या तरीही त्यातून मार्ग निघेल. तुमची निर्णयक्षमता वाढवावी लागेल. काही धाडसी निर्णय घ्यावे लागतील. ज्येष्ठांच्या सल्ल्याचा उपयोग होईल. पराक्रमाला भाग्याची साथ मिळणार आहे. नियोजनपूर्वक कष्टाला व्यवहारिकतेची जोड द्यावी. आर्थिक स्थिती सुधारेल. प्रतिस्पर्धी, स्पर्धक यांच्याशी वागताना भावनाशील होऊ नका.

घरामध्ये गैरसमज होणार नाहीत याकडे विशेष लक्ष द्यावे. बाहेरील लोकांना थारा देऊ नये. घरातील आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. जोडीदाराची मदत मिळेल. धार्मिक यात्रेचे योग आहेत. संततीशी संघर्ष होणार नाही याची काळजी. तुमच्या बोलण्यामुळे नुकसान होऊ शकते.

नेत्रविकार, हाडांचे दुखणे व कफविकार त्रास देऊ शकतात. मानसिक आरोग्य सांभाळणे आवश्यक आहे. थायरॉईड व मधुमेह असणाऱ्यांनी जास्त काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** ९, १०, १४.

## मकर

**तुमचा** राशीस्वामी शनी पराक्रमाशी जोडला गेला आहे. भाग्याची साथ मिळणार आहे. महत्त्वाकांक्षा वाढणार आहे. ती पूर्ण करण्यासाठी कष्टाला व्यवहारिकतेची जोड द्यावी. पुढाकार घेऊन नियोजन करून काम केल्यास यश नक्की मिळेल. आर्थिक स्थिती साधारण राहील. पैसा टिकवून ठेवा.

घरामध्ये संघर्ष टाळा. कुटुंबाची जबाबदारी घ्यावी लागेल. गृहसौख्य साधारण राहील. वारसाहक्काने धनलाभ होऊ शकतो. मित्रमंडळींपासून सावध राहा. संततीची चिंता राहील. प्रवास करावा लागला तरीही त्यातून फायदा होईल.

व्यावसायिकांनी नवीन संधी अचानकपणे मिळेल तिचा फायदा घ्यावा. मात्र पूर्ण अभ्यास करून, खात्रीशीर माहिती घेऊन पुढे पाऊल टाकावे. कलाक्षेत्रातील व्यावसायिकांना विशेष चांगला काळ आहे. नोकरदारांनी कष्टात कमी पडू नये. वरिष्ठांच्या मदतीवर अवलंबून राहू नका. हाडांचे दुखणे, संधिवात, नेत्रविकार याकडे लक्ष द्यावे. स्नायूंचे आजार त्रास देऊ शकतात. रक्ताभिसरण, रक्तन्यूनता यासंबंधी विकार होऊ शकतात.

**शुभ दिनांक :** ०९, १०, ११, १२.

## कुंभ

**राशीस्वामी** शनी बलवान स्थितीत असला तरीही काळजीपूर्वक वागणे हितावह ठरेल. स्वतःच्या चुकांमुळे नुकसान होणार नाही याची काळजी घ्या. नियोजन, पुढाकार, कष्ट व व्यावहारिकता तुमच्या यशासाठी उपयुक्त ठरेल. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. आर्थिक स्थिती चांगली राहील. अचानक धनलाभ होऊ शकतो. खर्चावर नियंत्रण आवश्यक. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याकडे कल राहील. खेळाडूंना यश मिळेल.

घरातील वातावरण धार्मिक राहील. जोडीदार व तुमच्या मध्ये अहंकार येऊन न देता सामंजस्य राखा. कुटुंबामध्ये तुमच्या बोलण्यामुळे गैरसमज होऊ शकतो. संततीच्या इच्छा तुम्ही पूर्ण कराल. भावंडांशी संघर्ष टाळून सुसंवाद ठेवा.

व्यावसायिकांसाठी सर्वसाधारण काळ आहे. भागीदारीत व्यवसाय असल्यास फायदेशीर ठरेल. नोकरदारांनी भावना बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य द्यावे. वरिष्ठांची साथ मिळेल.

खाण्यावर नियंत्रण आवश्यक आहे. प्रतिकारशक्ती चांगली असली तरीही आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. मधुमेह, डोळे याकडे विशेष लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** ११, १२, १४.

## मीन

**तुमच्या** कर्तृत्वाला वाव मिळेल. मनातील संभ्रम, अनावश्यक भीती काढून टाका. आत्मविश्वासाने पुढे जा. मनासारख्या गोष्टी घडण्यासाठी योग्य ते नियोजन करा. संयम राखणे महत्त्वाचे ठरेल. अति भावनाशील असणे तोट्याचे ठरेल. नुसत्या विचारांपेक्षा कृतीला प्राधान्य द्या. नियमांच्या चौकटीत राहूनच काम करावे. प्रवासाचे योग आहेत. त्यातून फायदा होईल.

घरापासून लांब जावे लागेल. जोडीदाराशी सामंजस्याने वागणूक ठेवा. त्याच्यासाठी वेळ काढा. संततीचे प्रश्न मार्गी लागतील. कुटुंबामध्ये विनाकारण संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. भावंडांचे सौख्य राहील.

व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. कागदपत्रांची नीट काळजी घ्या. परदेशाशी संबंधित व्यवसायक्षेत्र असल्यास फायदा होईल. नोकरदारांना आपले महत्त्व पटवून देता येईल. नियम काटेकोरपणे पाळावेत.

डोळ्यांचे आरोग्य सांभाळा. हाडांचे दुखणे त्रास देईल. पायांकडे विशेष लक्ष द्या. त्वचा विकार, वेदना देणारे आजार त्रास देऊ शकतात.

**शुभ दिनांक :** १३, १४, १५. ***

# नवा काळ

• मुंबई | रविवार ९ फेब्रुवारी, २०२५ • पान - ६


## देशातील सरकारी बँकांचा २४ व २५ मार्च रोजी संप

नवी दिल्ली - देशातील सरकारी बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवार २४ व २५ मार्च रोजी दोन दिवसांच्या संपाची घोषणा केली आहे. यासंदर्भात कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी बँकांना नोटीस पाठविली आहे. कर्मचारी भरती आणि कामाचा पाच दिवसांचा आठवडा करावा या आणि अन्य मागण्यांसाठी हा संप पुकारला आहे. नऊ सरकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन या संघटनेने हा संप पुकारला आहे. संघटनेने आपल्या मागण्यांची माहिती देताना म्हटले आहे की, सरकारी बँकांच्या संचालक मंडळावर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी घेतले जावे या विषयावर सरकारबरोबर आणि बँक व्यवस्थापनाबरोबर चर्चा होऊनही यातून मार्ग निघालेला नाही. अर्थ मंत्रालयातील वित्तीय सेवा विभागाने जास्त काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जास्त पगार आणि इतर सवलती देण्याचे पत्रक प्रसिद्ध केले आहे. हे पत्रक परत घेतले जावे. कारण यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मतभेद निर्माण होतील. सरकारकडून बँकांच्या कामकाजात हस्तक्षेप केला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

## मतदानाच्या शेवटच्या क्षणापर्यंत भाजपाने पैसे वाटले! राऊतांचा आरोप

■ नवी दिल्ली

**दिल्ली** विधानसभा निवडणुकीचा आज निकाल जाहीर झाला. या निकालावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी निवडणुकीच्या शेवटच्या क्षणापर्यंत भाजपा पैसे वाटप करत असल्याचा आणि दिल्लीतही 'महाराष्ट्र पॅटर्न' लागू करण्यात आल्याचा आरोप केला. एवढेच नाही तर काँग्रेस आणि आपचे मनोमिलन झाले असते तर ही परिस्थिती आली नसती, असे सांगत त्यांनी काँग्रेसलाही कानपिचक्या दिल्या.

संजय राऊत म्हणाले की, आमची कालच राहुल गांधी यांच्यासोबत पत्रकार परिषद



झाली. दिल्लीमध्ये देखील महाराष्ट्र पॅटर्न लागू केलेले आहे. महाराष्ट्रात त्यांना त्या पॅटर्नचे यश मिळाले. प्रत्येक मतदारसंघामध्ये किमान १५ ते २० हजार मते वाढवली. ही ३९ लाख मते आली कुठून आणि जाणार कुठे? असे मला विचारले तेव्हा मी सांगितले की, त्यातली काही मते बोगस मतदार ही दिल्लीमध्ये वळवली आणि त्यानंतर ३९ लाख मते तशीच्या तशी बिहार निवडणुकीत जातील. फॉर्म्युला ठरलेला आहे. केजरीवाल यांनी १० वर्षे उत्तम काम केले. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे राजकारण व्यक्तिगत पातळीवर नेतात. कारण ते व्यापारी आहेत. दिल्ली लहान राज्य आहे. पैसे शेवटच्या मिनिटांपर्यंत वाटत होते, मी माझ्या डोळ्यांनी पाहिले. दिल्लीत होतो मी त्यादिवशी.

### भाजपाची जाहीरनाम्यातील आश्वासने

भाजपाने निवडणूक जाहिरनाम्यात आश्वासन दिले की, महिलांना दर महिना २५०० रुपये दिले जातील.

- महिना २० हजार लीटर मोफत पाणीपुरवठा करू,
- १० लाखांची आरोग्य विमा योजना दिली जाईल,
- सिलिंडरवर ५०० रुपये सबसिडी मिळेल,
- सणावेळी गॅस सिलिंडर मोफत मिळतील,

आता या आश्वासनांची पूर्तता करावी लागेल.

### २०२० सालच्या निवडणुकीत भाजपाच्या केवळ ८ जागा

८ फेब्रुवारी २०२० रोजी दिल्ली विधानसभा निवडणुका झाल्या. तेव्हा ६२.८२ टक्के मतदान झाले होते. केजरीवाल हे 'आप'चे नेते होते तर मनोज तिवारी भाजपाचे नेतृत्त्व करीत होते. या निवडणुकीत आपला ६२ (त्याआधी आपचे ६७ आमदार होते. या निवडणुकीत ५ सीट कमी झाल्या) आणि भाजपाला ८ (आधीच्या ३ आमदारात आणखी ५ आमदारांची भर पडली) जागी विजय मिळून पुन्हा एकदा म्हणजे तिसऱ्यांदा आप सरकार सत्तेवर आले. काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही.

## सत्येंद्र जैन यांचा शकूर बस्तीत पराभव

■ नवी दिल्ली


**शकूर** बस्ती मतदारसंघात आम आदमी पक्षाचे उमेदवार सत्येंद्र जैन यांचा २०९९८ मतांनी पराभव झाला. या मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार कर्नेल सिंह यांचा ५६ हजार ८६९ मतांनी विजय झाला. सत्येंद्र जैन यांना ३५ हजार ८७१ मते मिळाली. काँग्रेसचे सतिश लुथ्रा यांना ५ हजार ७८४ मते मिळाली. सत्येंद्र जैन हे अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचाराविरुद्धच्या चळवळीत सहभागी झाल्यानंतर ते राजकारणात आले. शकूर बस्ती मतदारसंघातून ते २०१३ मध्ये निवडून आले. २०२० च्या निवडणुकीत आपचे उमेदवार सत्येंद्र जैन यांनी ७,५९२ मतांच्या फरकाने ही जागा जिंकली.

## मनीष सिसोदियांचा पराभव

■ नवी दिल्ली

**दिल्लीचे** माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचा जंगपुरा मतदारसंघातून ६०६ मतांनी पराभव झाला. या मतदारसंघात भाजपाचे तरविंदरसिंग मारवाह हे विजयी झाले आहेत. सिसोदिया यांना ३४ हजार ६० मते मिळाली तर तरविंदर यांना ३४ हजार ६६६ मते मिळाली. या ठिकाणी काँग्रेसचे फरहाद सुरी उभे होते. त्यांना तिसऱ्या क्रमांकाची म्हणजेच ६ हजार ८६६ मते मिळाली आहेत.

दारू घोटाळ्यात अटक झाल्यानंतर जामिनावर सुटलेले दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी यावेळी पटपडगंज मतदारसंघाऐवजी जंगपुरा येथून निवडणूक लढवली. तरविंदर सिंग मारवाह या मतदारसंघात दोन वेळा विजयी झाले आहेत.



तर मनीष सिसोदियाही याआधी पटपडगंजमधून दोन निवडणुका जिंकले होते. यावेळी मात्र सिसोदियांचा पराभव झाला आहे. त्यांना हरवणारे मारवा यांनी २०२२ मध्ये काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला होता. मारवा हे भाजपाच्या शीख नेत्यांपैकी एक महत्त्वाचे नेते आहेत.

## आपसात लढत राहा अब्दुल्लांचे सूचक ट्विट



■ श्रीनगर

**दिल्ली** विधानसभा निवडणुकीत आप व काँग्रेसच्या एकमेकांविरोधात लढण्यावर जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज सूचक ट्विट केले आहे. 'जी भरकर लढो, समाप्त करदो एक दुसरेको' असे महर्षी व्यास म्हणत असल्याचा व्हिडिओ त्यांनी शेअर केला आहे. इंडिया आघाडीच्या घटक पक्षामधील नॅशनल कॉन्फरन्सने पहिल्यांदा या दोन्ही पक्षांच्या एकमेकांविरोधात लढण्यावर जाहीर भाष्य केले आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप व काँग्रेसने वेगवेगळे लढण्याऐवजी ही निवडणूक इंडिया आघाडीच्या माध्यमातून एकत्र लढण्याचा प्रस्ताव अनेकांनी दिला होता. त्यावर मात्र दोन्ही पक्षांनी आडमुठेपणा करत स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला. याचा फायदा भाजपाला मिळणार असा कयास अनेकांनी व्यक्त केला होता. निकालातूनही हे आता स्पष्ट झाले असल्याने ओमार अब्दुल्ला यांनी हे ट्विट केले आहे. त्यांच्या या ट्विटवर आप व काँग्रेस एकत्र काही विचार करतात का हे आता पाहावे लागणार आहे.

## नाचता येईना अंगण वाकडे

### एकनाथ शिंदेंची विरोधकांवर टीका

■ मुंबई

**दिल्लीतील** भाजपाचा विजय हा विकासाच्या दृष्टीकोनाचा विजय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या राजकारणाला दिल्लीच्या जनतेने दिलेली ती साथ आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. विरोधकांचे विविध आरोप म्हणजे 'नाचता येईना अंगण वाकडे' अशी स्थिती असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधक पराभवानंतर काही ना काही कारणे सांगत असतात. ते कर्नाटकात जिंकले तेव्हा ईव्हीएम चांगली होती, लोकसभेला त्यांना चांगल्या जागा मिळाल्या. त्यावेळीही ईव्हीएम चांगली होती. पराभव झाल्यानंतर मात्र ते निवडणूक आयोगावर टीका करतात. काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा दिल्लीत एकही जागा जिंकता आलेली नाही. त्यामुळे त्यांच्या नेत्याने आता स्वतःहूनच नेतृत्व सोडण्याची वेळ आलेली आहे.

## अरविंद केजरीवालांचा पराभव परवेश वर्मा जायंट किलर



■ नवी दिल्ली

**नवी** दिल्ली मतदारसंघात आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा ४०८९ मतांनी पराभव झाला. या मतदारसंघातून भाजपाचे परवेश वर्मा यांचा विजय झाला. ते जायंट किलर ठरले आहेत. परवेश वर्मा यांना ३० हजार ८८ मते आणि अरविंद केजरीवाल यांना २५ हजार ९९९ मते मिळाली. काँग्रेसचे संदीप दीक्षित यांना ४५६८ मते मिळाली. अरविंद केजरीवाल हे २०१३, २०१५ आणि २०२० मध्ये या जागेवरून विजयी झाले होते. या तिन्ही वेळी ते दिल्लीचे मुख्यमंत्री झाले होते. २०१३ मध्ये केजरीवालांनी शीला दीक्षित यांचा पराभव केला होता.

परवेश वर्मा हे माजी मुख्यमंत्री साहेब सिंग वर्मा यांचे पुत्र आहेत. परवेश वर्मा यांनी दिल्ली विद्यापीठाच्या किरोरी मल कॉलेजमधून वाणिज्य शाखेत पदवी (बी.कॉम) घेतली. फोर स्कूल ऑफ मॅनेजमेंटमधून आंतरराष्ट्रीय व्यवसायात एमबीए केले. त्यानंतर ते राजकारणात आले. त्यांना २००९ मध्ये पश्चिम दिल्ली मतदारसंघातून लढण्यास इच्छुक होते. पण भाजपाने त्यांना मेहरौलीतून विधानसभेची उमेदवारी दिली. त्यांनी काँग्रेसच्या योगानंद शास्त्री यांचा पराभव केला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम दिल्ली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकून ते खासदार झाले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या महाबल मिश्रा यांचा पराभव केला. यावेळी त्यांना केजरीवाल विरोधात उभे केले. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत त्यांचे नाव आघाडीवर आहे.

## बेगाने शादीमें अब्दुल्ला दिवाना अजित पवार खूश का झाले?

■ मुंबई

**दिल्ली** विधानसभा निवडणुकीत 'एनडीए'चा प्रमुख घटकपक्ष असलेल्या भाजपाला मिळालेल्या ४० हून अधिक जागा या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर दिल्लीकरांनी व्यक्त केलेल्या विश्वासाच्या प्रतिक आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. स्वतः त्यांच्या पक्षाचे सर्व उमेदवार पराभूत झाले. त्याबाबत मात्र ते काहीही बोलले नाहीत. 'बेगाने शादी मे अब्दुल्ला दिवाना' अशी त्यांची स्थिती होती.

ते म्हणाले की, केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या सर्वांगीण विकासाला दुप्पट गती मिळेल. चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, उत्तम शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधांचे, देशाच्या राजधानीचे सर्वांगसुंदर शहर हे दिल्लीकरांचे स्वप्न पूर्ण होईल असा मला विश्वास आहे.

## गौतम अदानींच्या मुलाचा विवाह सोहळा संपन्न

■ अहमदाबाद

**अदानी** ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांचा धाकटा मुलगा जीत अदानी यांचा विवाह काल अहमदाबाद येथे हिरे व्यावसायिकाची कन्या दिवा जैमिन शहा हिच्याशी संपन्न झाला. या लग्नाचे फोटो गौतम अदानी यांनी आपल्या समाजमाध्यम खात्यावरून शेअर



केले असून, लग्नाला अनेकांना बोलावता न आल्याबद्दल माफी मागितली आहे.

आपल्या पोस्टमध्ये गौतम अदानी म्हणाले की, हा एक छोटासा, अतिशय खासगी कार्यक्रम होता. त्यामुळे आम्हाला इच्छा असूनही आम्ही सर्व शुभचिंतकांना आमंत्रित करू शकलो नाही, त्याबद्दल मी माफी मागतो. मी तुम्हा सर्वांकडून दिवा आणि जीतसाठी मनापासून प्रेम आणि आशीर्वाद मागतो.

जीत आणि दिवा यांचा साखरपुडा मार्च २०२३ मध्ये झाला होता. आपल्या विवाहाच्या काही दिवस आधी म्हणजेच ५ फेब्रुवारी रोजी, जीत आणि दिवा यांनी २१ नवविवाहित दिव्यांग जोडप्यांची भेट घेऊन त्यांना आर्थिक मदत केली होती. याबरोबरच दरवर्षी ५०० दिव्यांग बहिणींच्या लग्नासाठी १० लाख रुपये मंगल सेवा करण्याचे वचन दिले असल्याची माहितीही अदानी यांनी आपल्या पोस्टमध्ये दिली आहे.

## नमिता मुंदडा यांची आमदारकी संकटात?

**बीड- विधानसभा** निवडणुकीत केज मतदारसंघात भाजपाच्या नमिता मुंदडा यांनी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांचा पराभव केला होता. या पराभवानंतर पृथ्वीराज साठे यांनी नमिता मुंदडा यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केली होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मागणी करूनही फॉर्म १७ सीची प्रत आपल्याला दिली नाही. त्याचप्रमाणे निवडणूक प्रक्रियेचे केलेले व्हिडिओ शूटिंग, सीसीटीव्ही फुटेज मागणी करूनही दिले नसल्याचे साठे यांनी आपल्या याचिकेत म्हटले होते.

## दिल्लीत शरद पवारांच्या हस्ते उपमुख्यमंत्री शिंदेंना पुरस्कार

■ नवी दिल्ली

**दिल्लीत** शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. एकनाथ शिंदे यांना 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मंगळवार ११ फेब्रुवारीला दिल्लीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते शिंदेंना हा पुरस्कार दिला जाणार आहे. दिल्लीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या



सन्माननीय व्यक्तींचा याच कार्यक्रमात गौरव केला जाणार आहे. राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यावेळी उपस्थित राहतील.

## ४ मे रोजी 'नीट-युजी' परीक्षा अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू

■ नवी दिल्ली

**वैद्यकीय** पदवी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेशाची देशपातळीवर घेण्यात येणारी 'नीट- युजी' परीक्षा ४ मे रोजी होणार आहे, अशी माहिती एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेने दिली आहे. ही परीक्षा ४ मे रोजी दुपारी २ ते ५ यावेळेत पेन आणि पेपर पद्धतीने घेतली जाणार आहे. या परीक्षेच्या अर्जाची प्रक्रिया काल शुक्रवारपासून सुरू झाली आहे.

अर्ज करण्याची शेवटची तारीख ७ मार्च रोजी असणार आहे. या परीक्षेच्या अर्जात सुधारणा करण्याची करण्याची अंतिम तारीख ९ ते ११ मार्च अशी असणार आहे. त्यानंतर ४ मे रोजी प्रत्यक्ष घेतली जाईल. देशातील इतर परीक्षांपेक्षा सर्वाधिक विद्यार्थी या परीक्षेला बसतात. गेल्या वर्षी तर तब्बल २४ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. यंदापासून या परीक्षेच्या पद्धतीत काही बदल करण्यात आले आहेत. या वर्षीपासून होणाऱ्या परीक्षेत पर्यायी प्रश्न रद्द करण्यात आले आहेत.



## आज मुख्य व हार्बर मार्गावर मध्य रेल्वेचा मेगाब्लॉक जाहीर

■ मुंबई

**मध्य** रेल्वेने विविध अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामासाठी उद्या रविवार ९ फेब्रुवारी रोजी मुख्य आणि हार्बर मार्गावर मेगाब्लॉक जाहीर केला आहे. माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० पर्यंत आणि हार्बर मार्गावर सीएसएमटी ते चुनाभट्टी/वांद्रे दरम्यान सकाळी ११.२० ते दुपारी ४.४० वाजेपर्यंत अप आणि डाऊन मार्गावर हा ब्लॉक राहील.

या ब्लॉक कालावधीत सीएसएमटीवरून सकाळी १०.५८ ते दुपारी ३.१० या वेळेत सुटणाऱ्या डाऊन जलद सेवा माटुंगा स्थानकात धीम्या मार्गावर वळवण्यात येणार आहेत. मुलुंड स्थानकातून या लोकल पुन्हा जलद मार्गावर वळवल्या जातील. त्यानंतर या स्थानकांदरम्यान या लोकल संबंधित थांब्यावर थांबून नियोजित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. हार्बर मार्गावरील सीएसएमटी ते चुनाभट्टी/वांद्रे दरम्यान सकाळी ११.१० ते दुपारी ४.४० पर्यंत अप आणि डाऊन हार्बर मार्गावर मेगाब्लॉक असणार आहे. त्यामुळे या कालावधीत सीएसएमटी ते पनवेल आणि वांद्रे/गोरेगाव सेवा रद्द राहतील. मात्र या कालावधीत पनवेल-कुर्ला-पनवेल दरम्यान विशेष सेवा चालवल्या जातील. ब्लॉकमुळे हार्बर मार्गावर प्रवाशांना सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुख्य मार्गावर आणि पश्चिम रेल्वे मार्गाच्या स्टेशनवरून प्रवास करण्याची परवानगी आहे.

## पाटीदार आंदोलनातील खटले रद्द करण्याचे आदेश

■ अहमदाबाद

**गुजरातमध्ये** पाटीदार समाजाच्या २०१५ साली झालेल्या आंदोलकांवरील ३०० प्रकरणांपैकी २७० गुन्हे मागे घेण्यात आले असून, राज्य सरकारने आणखी ९ गुन्हे रद्द करण्याची विनंती न्यायालयाला केली आहे. या ९ प्रकरणात पाटीदार समाजाचे नेते हार्दिक पटेल यांच्यावरील फौजदारी व देशद्रोहाच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. पाटीदार समाजाच्या आरक्षणासाठी २०१५ साली गुजरातमध्ये आंदोलन झाले होते.